# संपादकीय

## भारतीय प्रकाशकांचे पुण्यातील संमेलन

*फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स ही भारतातील सर्व प्रकाशन संघटनांची शिखर संस्था असून आंतरराष्ट्रीय प्रकाशन संघटनेशी (IPA) ती संबद्ध आहे. बांगला देश, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका, ग्रेट ब्रिटन व अमेरिका इत्यादी देशातील प्रकाशन क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये त्यामुळे भारताचाही सहभाग असतो, हा आपला अभिमानाचा विषय वाटायला हवा. या महासंघामध्ये केवळ बड्या इंग्रजी प्रकाशकांनाच प्रतिनिधित्व मिळते असे नाही, प्रादेशिक भाषांतील प्रकाशन संस्थांच्या समस्यांविषयीही महासंघाला जिव्हाळा वाटतो; आणि त्यांचे प्रश्न संघटितरीत्या एकत्र येऊन धसाला लावण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून महासंघ भारतीय भाषांतील प्रकाशकांचे संमेलन दरवर्षी घेत आहे. त्याची पहिली दोन संमेलने दिल्लीमध्ये झाली. यावेळचे संमेलन प्रथमच दिल्लीबाहेर म्हणजे पुण्याला झाले. पुण्यातील प्रकाशकांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या अ. भा. मराठी प्रकाशक संघ या संस्थेने या संमेलनाची सर्व धुरा वाहिली आणि दि. २०-२१ फेब्रुवारी रोजी हे संमेलन उत्तम प्रकारे पार पडले. या संमेलनाला विविध भारतीय भाषांतील सुमारे साठ प्रकाशक हजर होते. मराठी प्रकाशकही सत्तरावर हजर होते. मध्यप्रदेशचे राज्यपाल डॉ. भाई महावीर प्रसाद यांच्या हस्ते अठरा भाषांतील अग्रगण्य प्रकाशकांना आणि मुंबईच्या 'आयडियल' बुक कंपनीस सन्मानपत्र देऊन त्यांचा खास गौरव करण्यात आला. त्यावेळी भारतीय प्रकाशन व्यवसायाचे विशाल स्वरूप आणि विविध भाषांमध्ये चाललेल्या प्रकाशनक्षेत्रातील कार्य याचे त्या व्यासपीठावरून जे दर्शन झाले ते प्रभावशाली होते. सिंधी भाषेत प्रकाशन संस्थाच नाहीत; कारण सिंधी ही भाषा कोठेही शिकवली जात नाही; सिंधीला लिपी नाही - उर्दू किंवा देवनागरी सोयीप्रमाणे वापरली जाते. सिंधी माणूस पुस्तके वाचत नाही; सिंधी प्रकाशक जाहिराती गोळा करून पुस्तकाच्या छपाईचा खर्च वसूल करतात आणि पुस्तके छापून वाचकांना फुकट वाटतात असे हरी मोटवानी यांनी सांगितले. जम्मूच्या डोगरी भाषेत चौकाचौकात पथ नाट्ये करून, त्यातून पैसे मिळवून पुस्तके छापण्यात येतात अशी माहिती देण्यात आली. डुग्गर प्रकाशनने १९९०पासून वर्षाला दहावीस पुस्तके काढली आहेत. पण १५०नाटके बसवलेली आहेत. उच्च माध्यमिक शाळांमध्ये डोगरी भाषा शिकवण्यात येते. त्यामुळे डोगरी साहित्याला चांगली मागणी यावी अशी अपेक्षा आहे.*

*फेडरेशनचे अध्यक्ष हिंद पॉकेट बुक्सचे दीनानाथ मल्होत्रा यांनी आपल्या अभिभाषणात भारतातील प्रकाशन व्यवसायाची ताजी आकडेवारी दिली तीही प्रकाशनक्षेत्राच्या वाढत्या व्यापकतेची साक्ष देणारी होती. काश्मीरी, डोगरी, कोकणी, सिंधी या भाषात शंभराच्या आत पुस्तके १९९७ साली निघाली. संस्कृत व उडिया या भाषांत प्रत्येकी सहाशे पुस्तके निघाली. यात पाठ्यपुस्तकांचाही समावेश असल्याने केवळ ललित वाङ्मयाची ही आकडेवारी नाही हे लक्षात घेतले पाहिजे. कन्नड, उर्दू, असमिया, पंजाबी, या भाषांत हजार ते पंधराशे पुस्तके निघाली. तेलगू, गुजराती व मल्याळी भाषांमध्ये अडीच हजाराच्या आतबाहेर असे प्रमाण आहे.*

*मराठी आणि बंगाली या भाषांमध्ये चार हजाराच्या आसपास पुस्तकांची संख्या जाते. तमिळ त्यामानाने पुढे आहे. ५८०० पुस्तके तमिळमध्ये आहेत. सर्वात जास्त पुस्तके हिंदीमध्ये निघतात. सोळा हजाराच्या घरात त्यांची संख्या जाते. त्याखालोखाल १२ हजार पुस्तके १९९७मध्ये इंग्रजीत निघाली. हिंदी भाषिक लोकसंख्या सुमारे ४० टक्के आहे हे लक्षात घेता हिंदीत जास्त पुस्तके निघतात याचे आश्चर्य वाटायला नको. या संमेलनात विविध भाषांतील प्रकाशकांनी ज्या समस्या मांडल्या त्यावरून मराठीतील ग्रंथव्यवहार त्यामानाने फारच वाखाणण्याजोगा आणि सुस्थितीत आहे असे दिसून आले. मराठीत सुमारे सहाशे प्रकाशक ऑपरेशन ब्लॅकबोर्डमध्ये सहभागी होतात; परंतु दोनशे प्रकाशन संस्था आहेत; आणि त्यापैकी पंचवीस तीस प्रकाशन संस्था दरवर्षी दहांपेक्षा जास्त पुस्तके काढणाऱ्या आहेत. दरवर्षी पन्नासपेक्षा जास्त पुस्तके काढणाऱ्या दहाबारा संस्था निघतील. बालवाङ्मय, धार्मिक वाङ्मय किंवा गाईडस इ. पुस्तके काढणाऱ्यांचा समावेश यात केलेला नाही. साठ हजार पुस्तके भारतात निघतात असे आपण म्हणतो तेव्हा त्यात बालवाङ्मय आणि पाठ्यपुस्तके यांचीही गणना होते. कथा, कादंबऱ्या, काव्य, नाटक, वैचारिक लेखन वगैरे प्रकारांतील पुस्तके त्याच्या २५टक्केही नसतील. देशात २२७ विद्यापीठे आहेत. ९००० महाविद्यालये, ९८ हजार उच्च माध्यमिक विद्यालये, १ लाख १७ हजार माध्यमिक विद्यालये आणि ५ लाख ९० हजार प्राथमिक शाळा आहेत. तेव्हा भारतीय भाषांतील पुस्तकांना पुढेही मोठा वाचकवर्ग असणार आहे आणि भारतीय पुस्तकांच्या निर्यातीलाही मोठी संधी मिळण्यासारखी आहे. भारताचा प्रकाशन व्यवसायाच्या दृष्टीने जगात सातवा क्रमांक लाभतो; तेव्हा या व्यवसायाचे विराट स्वरूप लक्षात घेऊन आपण बहुभाषिक प्रकाशनाकडे वळायला हवे असे वाटते.*

*श्री. दीनानाथ मल्होत्रा यांची तक्रार होती की प्रकाशकाचे महत्त्व व स्थान याची सम्यक कल्पना आज शासनाला आणि समाजाला आहे असे दिसत नाही. प्रकाशक म्हणजे केवळ एक व्यापारी, पुस्तकविक्रेता अथवा मुद्रक असे मानले जाते. त्यायोगे त्याच्या सामाजिक कामगिरीचा बोध होत नाही. पुस्तक प्रकाशित*

करताना प्रकाशक किती धोका पत्करत असतो याची पर्याप्त कल्पना समाज व सरकार यांना नसते. पुस्तकाच्या मुद्रणाचे स्वातंत्र्य व साहस हे प्रकाशन क्षेत्राचे मूळ अधिष्ठान आहे. धोका समोर दिसत असूनही खरा प्रकाशक आपली जबाबदारी झटकून मोकळा होत नाही. लेखक पुस्तक लिहितो, पण ते समाजापर्यंत पोचवण्यासाठी सर्व सव्यापसव्य प्रकाशक करतो. आपण समाजाचे काही देणे लागतो असे प्रकाशक मानतो आणि समाजाला कोणती पुस्तके आवश्यक आहेत हे बघून ती गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न तो करतो. केवळ एक व्यापारी अशी त्याची भूमिका नसते. तर समाजप्रबोधनाची, ज्ञानप्रसाराची आणि मूल्यसंवर्धनाची एक बैठक समाजाला लाभावी यासाठी तो जणू योग्य तो वैचारिक बौद्धिक माहितीपूर्ण दस्तऐवज पुरवत असतो. त्याची पूर्वतयारी करून देत असतो. भारतीय भाषांमधील प्रकाशकांनी एकत्र येऊन आपापले उत्तम साहित्य हिंदी-इंग्रजीद्वारे भारतात व जगात पोचवावे या दृष्टीने प्रकाशक संमेलनाचे व्यासपीठ प्रभावी रीतीने वापरता येईल. या संमेलनानिमित्त काढण्यात आलेल्या स्मरणिकेत काही भाषांतरयोग्य मराठी पुस्तकांचे परिचय देण्यात आले आहेत. त्यात अजून बरीच भर घालता येईल. परंतु ही कल्पना वास्तवात आली तर सर्वच भारतीय भाषांतील साहित्याचा भारतभर प्रसार होऊ शकेल.

एकूण हे संमेलन नवी दिशा व नवी अस्मिता जागवणारे ठरले.



"त्यावेळेला आम्ही अगदी हलक्या दर्जाचा माल हाताळत होतो. तेथे मूल्य वृद्धी जास्त होती. आम्ही त्याचं रूपांतर रोख रकमेत करत होतो. आमचा नफा वाढला. चांगल्या दिवसात प्रत्येकजणच व्यवहार करत असतो व नफ्याचे प्रमाणे कमी असतं. वाईट काळात तुम्ही समजा जास्त धंदा करू शकला तर तुम्हाला जास्त नफा मिळतो व जास्त संधी मिळते, हे स्वाभाविकच आहे. त्यामुळं जेव्हा बाजारपेठ कमकुवत असते तेव्हा आमचा धंदा दुप्पट होतो. अशावेळी इतर व्यापारी धंदा बंद करतात, कारण त्यांना भीता वाटते. त्यांच्यापाशी धाडस नसतं." असं विजय शहा म्हणतात, "आम्ही आमच्या कुवतीच्या बाहेर कधी गेलो नाही. पण महत्त्वपूर्ण टप्पे गाठले. हे फार महत्त्वाचं आहे. तुम्ही धडाक्यानं, वेगानं व्यवहार करू शकत असाल तर असे टप्पे गाठता येतात. आम्ही खरेदी करणं कधी थांबवलंच नाही. त्यावेळी जेव्हा खरेदी करणारं दुसरं कोणी नव्हतं तेव्हा आम्हाला स्वस्तात सौदे करता आले."

"प्रत्येक व्यवसायात सर्वच जण चांगले असतात असे नव्हे. हिऱ्याच्या व्यापाराबाबतही हे खरे आहे. पण आमच्या कंपनीबद्दल विचाराल तर आमच्याबद्दल बाजारात तुम्हाला कधीही तक्रार ऐकू येणार नाही. कारण एक दिवसानंतर नव्हे तर एक दिवस आधीच पैसे देण्यावर आमचा विश्वास आहे." भरत म्हणतात, "व्यवसायात सर्वाधिक प्राधान्य असतं प्रतिष्ठेला, आणि ती मिळवणं काही सोपं नसतं, माझ्या अग्रक्रमाच्या यादीत पैशाला सर्वात शेवटचं स्थान आहे, ज्यू मंडळी अगदी शेवटपर्यंत फायदा उठवतात, तर काही भारतीय व्याज आणि अन्य बाबतीत फायदा घेतात. परंतु तुम्ही फसवणूक करू शकत नाही. आम्ही वेळेवर पैसे देतो. व्यवसायात जर प्रतिष्ठा असेल तर ती कशाला कोण गमावेल?"

**— हिरेसम्राट भरत आणि विजय शहा**

**यात्रमाणेच आठ उद्योगपतींच्या उत्तुंग यशाचे झळाळते आलेख**

**बिझिनेस महाराजे**

*मूळ लेखक :* ***गीता पिरामल***
*अनुवाद :* ***अशोक जैन***
*किंमत : दोनशेपन्नास रुपये*
*सवलत : दोनशे रुपये*

*आपली मागणी लवकरात लवकर नोंदवा.*

# साहित्य वार्ता

## चांगली कविता हा गोड अपघात - तेंडुलकर

कविता म्हणजे जगण्यावर उगवलेला कोंब आहे. पण तो कसा येतो याचा शास्त्रीय खुलासा करता येत नाही. मात्र चांगली कविता हा एक गोड अपघात आहे व तो कसा झाला हे कवीलाही कळत नाही, असे उद्‌गार ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी काढले.

बहिणाबाई प्रतिष्ठान, पुणेतर्फे देण्यात येणाऱ्या बहिणाबाई व महानोर काव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. महात्मा फुले सभागृहात आयोजित कार्यक्रमात कवी सतीश काळसेकर व नारायण कुलकर्णी कवठेकर, पुरुषोत्तम पाटील व प्रकाश होळकर यांना पुरस्कार देण्यात आले.

कवी होऊ शकलो नाही म्हणून आपण नाटककार झालो, असे सांगून तेंडुलकर म्हणाले की, कवी मंडळी अद्‌भूत असतात. त्यांच्या पायाशी बसून कविता कशी उगवते हे पाहायला पाहिजे. कविता माझ्याकडे येत नाहीत, पण एखादी कविता मी वाचतो, ऐकतो तेव्हा ती मला आपली अशी वाटते. कविता समजावून सांगताना आपण तिच्याभोवती फिरतो, पण कविता त्याच्याही पलीकडे जाऊन बोलते.

संगीत दिल्यानंतर कविता ऐकायला चांगल्या वाटतात. पण गेय कवितेद्वारे जे आपल्याकडे पोहोचते ते त्याला संगीताची जोड दिल्यानंतर नाही, असेही त्यांनी सांगितले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. वसंत पाटील यांनी प्रास्ताविक केले.

## पोलंडचे वाङ्‌मयप्रेम

मराठी भाषेला रक्तक्षय झाल्याची ओरड साहित्य संमेलनातून चालू असताना कम्युनिस्ट जोखडाखाली ४५ वर्षे अडकलेल्या पोलंडमध्ये हिंदी आणि संस्कृत या भाषा अतिशय लोकप्रिय होत असल्याचे ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. इंग्रजी ही ज्ञानभाषा असल्यामुळे तिच्यापुढे नांगी टाकून आपण मोकळे झालो आहोत आणि मातृभाषेच्या नावाने फक्त गळे काढण्याचे काम करीत आहोत. पोलंडमध्ये मात्र भारतीय भाषांबद्दल आदर आहे. तेथील साहित्यवर्तुळात संस्कृत, हिंदी या भाषांवर संशोधन करणाऱ्यांची संख्या शंभराच्या घरात गेली आहे. बंगाली आणि तामीळ या भाषाही तेथे शिकविल्या जातात. संस्कृत आणि हिंदी यांच्याबद्दल आकर्षण आहे, ते त्या भाषांतील अभिजात वाङ्‌मयाचे. तुलसीदासांची 'रामकथा' आणि कबीराचे 'दोहे' तेथे लोकप्रिय आहे, तसाच मान प्रेमचंद यांच्या 'मैला आचल'ला मिळाला आहे. ज्ञात्यांना आनंद देते आणि इतरांची समज वाढविते, ते अभिजात वाङ्‌मय अशी एक व्याख्या केली जाते. संस्कृत ही तर अभिजात साहित्याची गंगोत्रीच आहे.



बंगालीतही उत्तम लिखाण केले गेले आणि बंगाली माणूस जगाच्या पाठीवर कोठेही गेला तरी भाषाप्रेम सोडत नाही. मराठी माणूसही अनेक देशांमध्ये पोहोचला आहे. आपले भाषाप्रेम त्याने बरोबर नेले तर मराठी साहित्याचाही झेंडा विविध विश्वविद्यालयांतून फडकू शकेल. त्याचबरोबर मराठीतही ताज्या दमाचे अभिजात वाङ्‌मय निर्माण झाले पाहिजे. सभासंमेलनातून होणाऱ्या फटकळ वादांमध्ये शक्ती घालविण्याऐवजी अशा मूलभूत बाबींकडे मराठी माणसाचे लक्ष गेले तर मराठीला रक्तक्षय होण्याची भीती नाही.

## 'साहित्याच्या वेगवेगळ्या चुली; तरी चळवळ वाढीसाठी त्या आवश्यक'

आजच्या साहित्यात शहरी, ग्रामीण, दलित, सवर्ण अशा वेगवेगळ्या चुली निर्माण झालेल्या असल्या, तरी साहित्याची चळवळ जिवंत राहण्यासाठी या चुली आवश्यक असल्याचे प्रतिपादन अकोला येथील प्रसिद्ध ग्रामीण लेखक व 'गोधडी'कार आण्णासाहेब देशमुख यांनी देवळालीजवळच्या पळसे येथील सार्वजनिक वाचनालय व नाशिक ग्रामीण साहित्य चळवळ यांच्या वर्धापनदिनी व्यक्त केले. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ या संतांनी दाखविलेले मार्ग छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रभू श्रीराम यांचे अनेक दाखले देत ग्रामीण भागातील सामाजिक चळवळीचे चित्र त्यांनी उभे केले.

## रसिकांच्या मनाशी संवाद साधल्यास प्रतिसाद मिळतोच : कुवळेकर

"रसिकांच्या मनाशी संवाद साधला गेला, की प्रतिसाद हा मिळतोच. मग त्याला नाट्यप्रकाराचे बंधन राहत नाही," असे प्रतिपादन विजय कुवळेकर यांनी केले.

आभा प्रकाशनतर्फे एकाच वेळी ६४ एकांकिका आणि चार नाटके यांच्या पुस्तकांचे प्रसिद्ध अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

"नाट्यप्रकार कोणताही असला तरी त्यातील आशयाला महत्त्व आहे. रसिकांच्या मनाचा अंदाज नाटककाराला घेता आला पाहिजे. काही एकांकिका एवढा अनुभव देतात, की त्यांना कोणतीही चौकट लावता येणार नाही. एकांकिकाच नव्हे, तर कोणताही वाङ्‌मयप्रकार लिहिण्यास अवघड असतो. वाङ्‌मयाची निर्मिती करताना शब्दांवर तर हुकुमत हवीच; पण जे लिहितो ते उत्स्फूर्त हवे. तसेच, कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय हवा."

"एकांकिकेत संपूर्ण नाट्यानुभव मिळत असेल, तर त्याला खंडित नाटक म्हणून हिणवायचे काही कारण नाही. वास्तविक एकांकिका या नावात या नाट्यप्रयोगाचे यथार्थ दर्शन होत नाही," असे नाटककार श्रीनिवास भणगे यांनी नमूद केले. "जे मनाला आनंद देते ते लिहायचे असते. त्यात आपले अनुभव ओतायचे असतात. खरे तर याद्वारे आपण आपले आत्मचरित्रच रेखाटत असतो," असे श्री. रमेश पवार यांनी सांगितले.

श्री. मोहन जोशी यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. ते म्हणाले, ''स्पर्धेच्या वेळी एकांकिका शोधणे अवघड होऊन बसते. ऐनवेळी मग नेहमीच्याच एकांकिका बसवाव्या लागतात. या उपक्रमाने अनेक नवीन एकांकिका रसिकांना उपलब्ध झाल्या आहेत. या नव्या एकांकिकांना प्रतिसाद देणे ही आपली जबाबदारी ठरते.''

आभा प्रकाशन आणि परेश एजन्सीजचे प्रमुख मधुसूदन भाटे यांनी प्रास्ताविक केले. श्री. गो. रा. जोशी यांनीही आपले विचार व्यक्त केले.

एकाच वेळी एकाच प्रकाशन संस्थेकडून एवढ्या संख्येने नाटकांची पुस्तके प्रकाशित होणे हा एक विक्रमच म्हणावा लागेल. त्याची नोंद घेण्यास 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'चे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. आनंद म्हसळेकर, योगेश सोमण, विदुला कुडेकर, प्रमोद काळे, विनीता पिंपळखरे, राजू फुलकर, सुभाष पारखी, जयंत बेंद्रे, राजीव जोशी या नाटककारांचा सत्कार करण्यात आला.

## 'झुंज कॅन्सरशी!' या अनुवादित कथासंग्रहाचे प्रकाशन

'झुंज कॅन्सरशी!' या अनुवादित कथासंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र टाइम्सचे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. हा कथासंग्रह मिरज येथील सुप्रसिद्ध डॉक्टर डी. के. गोसावी यांनी अनुवादित केला आहे. या प्रसंगी प्रा. म. द. हातकणंगलेकर, प्रा. अविनाश सहस्रबुद्धे व सांगली नगरवाचनालयाचे अध्यक्ष श्री. अनिल सहस्रबुद्धे उपस्थित होते. यावेळी उपस्थितांचे स्वागत मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनिल मेहतांनी केले.

*अविनाश सप्रे, अनिल मेहता, डॉ. गोसावी, कुमार केतकर, म. व. हातकणंगलेकर, प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे*



## प्रकाशकांनी अर्थप्राप्ती व समाजहिताचा समन्वय साधावा - डॉ. महावीर

एकविसाव्या शतकात पदार्पण करत असतांना भारताची थोर सहिष्णू परंपरा लक्षात घेऊन भारतीय भाषातील प्रकाशकांनी अर्थप्राप्ती व समाजहित यांचा समन्वय साधावा असे आवाहन मध्यप्रदेशनचे राज्यपाल व हिंदी साहित्यिक डॉ. भाई महावीर यांनी केले आहे. फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशिर्स (दिल्ली) व अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ यांनी आयोजित केलेल्या भारतीय भाषातील प्रकाशकांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

भाई महावीर पुढे म्हणाले की, ''ज्या भारतात देवाच्या द्वारी उभे राहून देवाला नावे ठेवण्याएवढी सहिष्णुता होती त्या देशात मूलतत्त्ववादाचा प्रसार झपाट्याने होतो आहे. अशा वेळी कोणाचेही अनुकरण न करता अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश आणण्याचे कार्य प्रकाशकांनी करायला हवे. सध्या माणसे सत्याच्या ज्ञानापासून दूर जात आहेत व उदासीन राहात आहेत. अशा वेळी समाजात आपले स्थान काय याचा विचार प्रकाशकांनी स्वत:च करावा.''

या समारंभामध्ये आसामी, बंगाली, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कानडी, काश्मिरी, कोंकणी, मल्याळम्, मराठी, उडिया, पंजाबी, सिंधी, संस्कृत, तामिळ, तेलगू व उर्दू भाषेतील प्रकाशकांचा सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला एफ.आय.पी.चे अध्यक्ष दीनानाथ मल्होत्रा यांनी भारतीय भाषातील प्रकाशकांच्या कार्याचा आढावा घेतला. मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्ष शरद गोगटे यांनी स्वागत केले. एफ. आय. पी.चे सचिव नरेंद्रकुमार यांनी आभार मानले व सहसचिव श्रीमती आशा रानी यांनी सूत्रसंचालन केले.

तिसऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या वेळी पुढील ठराव पास करण्यात आले. पोस्टल रजिस्ट्रेशनचे दर १२ रु. वरून ३रु. पर्यंत कमी करावेत, व्ही. पी. बुक पोस्टसाठी ५० रुपये ऐवजी २००रु. किंमतीपर्यंतच्या पुस्तकांना सवलत द्यावी, पुस्तकांची सूची छापील पुस्तक दराने पाठवण्याची सवलत असावी. १९९५ साली सुरू केलेली आयकरातील सूट पुन्हा चालू करावी, आय.एस.बी.एन. नोंदणी न करणाऱ्यांकडून सरकारने पुस्तक खरेदी करू नये, पुस्तकांच्या जाहिरात दरावर दूरदर्शनने दिलेली सवलत चालू ठेवावी, इंग्रजी नियतकालिकांनी भारतीय भाषातील चांगल्या पुस्तकांचा परिचय करून द्यावा, वृत्तपत्रांनी पुस्तकांच्या जाहिरातीच्या दरात कपात करावी. कोणत्याही पुस्तकाचे बक्षीस जाहीर करताना प्रकाशकाचे नाव द्यावे.

## भाषांतर योग्य पुस्तके कळवा

मराठीतील जी पुस्तके अन्य भाषात अनुवादित व्हावीत असे वाटते त्या पुस्तकांची तपशीलवार सूची संकलित करण्याचा विचार अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाने केला

आहे. जे पुस्तक भाषांतरयोग्य वाटेल त्याचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशकाचे नाव व पत्ता पुस्तकाचा विषय, पृष्ठसंख्या, गोषवारा (शक्यतो इंग्रजीत), पुस्तकाची उपलब्धी वगैरे माहिती पुढील पत्त्यावर पाठवावी - प्राची चिकटे, द्वारा गोकुळ मासिक प्रकाशन, ११९४ सदाशिव पेठ, कॅनरा बँकेजवळ, पुणे ४११०३०.

## कृषिज्ञानकोशाच्या पहिल्या खंडाची मुद्रणप्रत तयार

नऊ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर भारतीय संस्कृती कोश मंडळाच्या कृषिज्ञानकोशाचे काम पूर्ण झाले असून, त्याच्या पहिल्या खंडाची मुद्रणप्रत तयार झाली आहे. शेती या विषयावर मराठीत व भारतीय भाषांत तयार होणारा हा पहिलाच ज्ञानकोश आहे. हा कोश अशोक महादेव जोशी यांनी संपादित केला आहे.

यापूर्वी पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी संपादित केलेल्या 'भारतीय संस्कृती कोशा'चे दहा खंड व 'मुलांचा संस्कृती कोशा'चे चार खंड प्रकाशित झाले आहेत. आता शेतकऱ्यांच्या हातात शेतीविषयक सर्व माहिती देणाऱ्या या ज्ञानकोश प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पानुसार प्रत्येकी ३०० पानांचे १५ खंड प्रकाशित होणार असून त्याला पाच कोटी रुपये खर्च येणार आहे.

## 'मराठी मुक्तछंद' अभ्यासकांसाठी उपयोग - डॉ. वि. स. जोग

संशोधक, अभ्यासक आणि रसिकांना उपयोगी पडणाऱ्या दर्जेदार ग्रंथाची निर्मिती 'मराठी मुक्तछंद' या ग्रंथाच्या निमित्ताने झाली असल्याचे मत डॉ. वि. स. जोग यांनी नागपूर येथे डॉ. शुभांगी पातुरकर लिखित प्रबंधग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले.

ग्रंथाचे प्रकाशन प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. द. भि. कुलकर्णी उपस्थित होते. मराठीत मुक्तछंदावर ग्रंथच नव्हता, ती उणीव या ग्रंथाने भरून काढल्याचे प्राचार्य शेवाळकर यांनी सांगितले. इतक्या महत्त्वाच्या व अवघड विषयावरील ग्रंथ लिहून डॉ. पातुरकरांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. एका गंभीर, क्लिष्ट, तांत्रिक विषयावर प्रवाही, सुगम भाषेत ग्रंथ लिहिल्याबद्दल त्यांनी लेखिका व प्रबंध मार्गदर्शकाचे अभिनंदन केले.

छंदशास्त्राच्या क्षेत्रातील पूर्वसुरी डॉ. माधवराव पटवर्धन व डॉ. ना. ग. जोशी यांच्या कुळात शोभणारा हा कुलदीपक आहे, असे ते पुढे म्हणाले. मराठी कवींना आणि अभ्यासकांना प्रस्तुत ग्रंथाचा चांगला उपयोग होईल, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

अजोड व एकमेव असा संदर्भग्रंथ तयार केल्याबद्दल डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी डॉ. पातुरकरांचे अभिनंदन केले. विदर्भातील प्रबंध हे पश्चिम महाराष्ट्रातील प्रबंधापेक्षा गुणवत्तेच्या दृष्टीने सरस असतात ते म्हणाले.



# पुरस्कार

## महात्मा फुले अकादमीचा 'तंट्या भिल्ल' पुरस्कार

मराठा साहित्य क्षेत्रात आदिवासांच्या जीवनाशी संबंधित उल्लेखनीय साहित्य लिहिणाऱ्या साहित्यिकास यंदापासून नाशिक येथील 'महात्मा फुले अकादमीतर्फे' 'वीर तंट्या भिल्ल' साहित्य पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप २००० रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे आहे. हा पुरस्कार आदिवासी साहित्य संमेलनात देण्यात येणार आहे. जर हे संमेलन झालेच नाही, तर सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाच्या दिवशी ३ जानेवारीला नाशिक येथे पुरस्कार देण्यात येईल.

जानेवारी ९७ ते डिसेंबर ९८ दरम्यान प्रसिद्ध झालेले कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी, आत्मचरित्र आदी साहित्य महात्मा फुले अकादमी, कस्तुरी अपार्टमेंट, घारपुरे घाट, नाशिक या पत्त्यावर पाठवावे.

## ख्यातनाम समीक्षक रा. ग. जाधव यांना तुळसाबाई सोमाणी पुरस्कार

हिंगोली येथील नूतर साहित्य मंदिर वाचनालय व तुळसाबाई सोमाणी ट्रस्ट यांच्या विद्यमाने ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांच्या ''साठोत्तरी मराठी कविता व कवी'' या समीक्षाग्रंथाला पुरस्कार देण्यात आला आहे.

## ढवळे, भांडारकर संस्था, आयडियल यांना राष्ट्रीय पुरस्कार

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स (एफ आय पी) या संघटनेतर्फे केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे व आयडियल बुक कंपनी यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार तिसऱ्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये रविवार दि. २१ फेब्रुवारी रोजी मध्यप्रदेशनचे राज्यपाल व डॉ. भाई महावीर यांच्या हस्ते देण्यात आले. वाचक व प्रकाशक यांच्यामधील दुवा असणाऱ्या पुस्तक विक्रेत्यांचे महत्त्व लक्षात घेऊन दरवर्षी एका उत्तम पुस्तक विक्रेत्याला पारितोषिक देण्याची प्रथा चालू वर्षांपासून सुरू करण्यात येत आहे. यावर्षीचा हा बहुमान मुंबईतील आयडियल बुक कंपनी या संस्थेला मिळाला.

गौरविलेले इतर भाषांतील प्रकाशक पुढीलप्रमाणे - ज्योती प्रकाशन (आसामी), न्यू सेंट्रल बुक एजन्सी (बंगला), दुग्गल प्रकाशन (डोगरी), ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस (इंग्लिश), परिचय ट्रस्ट प्रवृत्ती (गुजराथी), राजकमल प्रकाशन (हिंदी), अनुपमा प्रकाशन (कन्नड), जे ॲण्ड के ॲकॅडमी ऑफ आर्ट, कल्चर ॲण्ड लँग्वेजेस (काश्मिरी), अपूर्वाई प्रकाशन (कोकणी), सी आय सी बुक हाऊस (मल्याळम), कटक स्टुडंटस् स्टोअर (उडिया), पलानीअप्पा ब्रदर्स (तामिळ), विशालांध्र पब्लिशिंग हाऊस (तेलगू), उर्दू ॲकॅडमी (उर्दू), कुंज पब्लिकेशन्स् (सिंधी), व पंजाबी ॲकॅडमी (पंजाबी).

## अशोक बेंडखळे यांना सुवर्णशिल्प पुरस्कार जाहीर

पाथर्डी अहमदनगर येथील अक्षर पुरोगामी या वाङ्मयीन संस्थेतर्फे अशोक बेंडखळे यांना मिखाईल गोर्बाचेव या शलाका प्रकाशन (मुंबई) यांनी प्रकाशित केलेल्या चरित्रग्रंथासाठी कै. धनंजय ढवळे स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा सुवर्णशिल्प पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप सुवर्णपान, शाल व श्रीफळ असे आहे. १ मे १९९९ रोजी समारंभपूर्वक हा पुरस्कार अहमदनगर येथे संपन्न होणार आहे.

## ज्ञानेश्वर मुळे यांना पानिपतकार विश्वास पाटील यांच्या हस्ते कौशिक पुरस्कार

शनिवार दि. ६ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात पानिपतकार विश्वास पाटील यांच्या हस्ते व समीक्षक शंकर सारडा यांच्या अध्यक्षतेखाली कौशिक पुरस्काराचे वितरण झाले.

सातारा येथील कौशिक प्रकाशनातर्फे दिल्या जाणाऱ्या कौशिक साहित्य पुरस्कारासाठी श्री. ज्ञानेश्वर मुळे यांनी लिहिलेल्या 'माती, पंख आणि आकाश' या आत्मकथनाची निवड करण्यात आली होती. तीन हजार रुपयांचा हा पुरस्कार असून प्रकाशक ए. कृ. जवळकर (बेळगाव) नवसाहित्य बुक स्टॉललाही एक हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला.

कोल्हापूर जिल्ह्यातील एका खेडेगावात सामान्य कुटुंबात जन्मलेल्या श्री. ज्ञानेश्वर मुळे यांची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवली. केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे त्यांची परराष्ट्र सेवेसाठी निवड झाली. जपान, रशिया इत्यादी देशात भारतीय कॉन्सलर म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी बजावली. श्री. मुळे यांचे मराठी, हिंदी, जपानी व रशियन भाषांतील काव्यसंग्रह प्रकाशित झालेले असून सध्या ते दिल्लीत अर्थमंत्रालयात आशियाई देशांचे आर्थिक सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

## बंगाली कवी शंकर घोष यांना पाच लाखांचा सरस्वती सन्मान पुरस्कार

बंगाली कवी व समीक्षक शंकर घोष यांना १९९८चा सरस्वती सन्मान पुरस्कार गंधर्व कवितागुच्छ या काव्यसंग्रहाबद्दल जाहीर करण्यात आला आहे. पाच लाखांचा हा पुरस्कार असून तो के. के. बिर्ला फाउंडेशनतर्फे देण्यात येतो.

## 'साहित्यवेध'ला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा रा. श्री. जोग पुरस्कार प्राप्त

डॉ. के. रं. शिरवाडकर यांच्या 'साहित्यवेध' या समीक्षात्मक ग्रंथास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा रा. श्री. जोग पुरस्कार पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते दि. १९ फेब्रुवारी रोजी देण्यात आला. पुस्तकाच्या प्रकाशकांचा करण्यात आलेला गौरव मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे श्री. अनिल किणीकर यांनी स्वीकारला.



*एक तरी ग्रंथ आठवावा! एक तरी ग्रंथ साठवावा*

**बालवाचकांसाठी २० पुस्तकांचा संच**
**फक्त १८० रुपयांत**

**अनेक पुरस्कारांचे मानकरी सुधाकर प्रभू यांच्या कथा-कादंबऱ्या**

**कादंबरी**
१ अमोल अमोल
२ धिटुकली
३ रानबावरा
४ राजहंस एकटा
५ वृक्ष आमचे सोयरे
६ गुहेतील गूढ
७ हिरवी हिरवीगार झाडे लावू चार

**कथा**
८ मोठा वृक्षमित्र
९ वाटेवरचा यांत्रिक
१० धडपडणाऱ्या मुलांच्या कथा
११ दिव्यत्वाची प्रचीती
१२ कथा ही समर्थ दासाची

**इतर लेखक**
१३ भिलाटीतीला नाग्या (धर्मराज माहुलकर)
१४ राजकोटचे रहस्य (डॉ. वायंगणकर)
१५ कोवळे हात (प्रभाकर दौड)
१६ मंदारची गोष्ट (नाटिका) (छाया धवसे)
१७ इंद्रधनुष्य (कविता) संध्या भिसे
१८ छोट्यांच्या गोष्टी (सुदेश केंजळे)
१९ हरवलेले शोध (पु. ग. वैद्य)
२० खेळ आमुचे जमतीचे (डॉ. श्रीधर राजगुरु)

वरील २४०रु. किंमतीची २० पुस्तके फक्त १८० रुपयात घरपोच मिळवा.
ड्राफ्ट किंवा मनीऑर्डर पाठवल्यास पुस्तके आमच्या खर्चाने पाठवू.
*शाळांनीही या सवलतीचा लाभ घ्यावा.* **मुदत १ जुलै १९९९**

*आमचा पत्ता :*

**अ. भा. बालकुमार मराठी साहित्य संमेलन**

*द्वारा* **सुधाकर प्रभु,** स्वानंद सोसायटी, सहकारनगर नं. २, पुणे ९.

# पुस्तक परिचय

**न्यूयॉर्क, लंडन आणि पॅरिस येथेही भेदाभेद आहेच**

## एकला चलो रे

**दया पवार**

बलुतंकार दया पवार यांना 'बलुतं'च्या निमित्तानं परदेश प्रवासाचे तीनदा योग आले. १९८२मध्ये फोर्ड फाउंडेशनची पंधरा हजार डॉलर्सची शिष्यवृत्ती मिळाल्याने न्यूयॉर्कला भेट देण्याचे आमंत्रण आले. न्यूयॉर्कला जाण्यासाठी पासपोर्ट व्हिसा मिळवणे, विमान प्रवासातील गमतीजमती, न्यूयॉर्कमधील वास्तव्य, तेथील मराठी माणसांचे अनुभव, निग्रो वस्तीतील फेरफटका, बरोबर असणाऱ्या लक्ष्मण माने वगैरे लेखकमित्रांच्या आवडीनिवडी यांची नोंद त्यांनी 'लाखाची गोष्ट' या लेखात घेतली आहे. या लेखाचा पहिला अर्धाअधिक भाग 'बलुतं'ला एक लाखाचा पुरस्कार मिळाल्यामुळे ऑफिसमधील सहकारी, इतर दलित लेखक, नातलग, शिक्षिका पत्नीला आलेले अनुभव, मुलाला व मुलीला ऐकावे लागलेले कडू-गोड शेरे यांची हकीकत सांगणारा आहे.

दुसरा लेख 'हिटलराच्या देशात' हा १९८६मध्ये फ्रँकफुर्ट येथील जागतिक ग्रंथप्रदर्शनाच्या निमित्ताने जर्मनीचा जो दौरा झाला, त्याचे वृत्त देणारा आहे. दया पवार हे रेल्वेमध्ये नोकरीला असल्याने रेल्वे मंत्रालयाकडून व गृहखात्याकडून पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय त्यांना परदेशी जाता येत नसते. ती परवानगी मिळवण्यासाठी दिल्लीत तळ ठोकून अशोक जैन, राम प्रधान, सुशीलकुमार शिंदे प्रभृतींच्या मदतीने प्रयत्न करावे लागले. या बुक फेअरला भारतातून २५-२६ लेखकांना आमंत्रण असते. २५ सप्टेंबर १९८६ रोजी सांताक्रूझहून दया पवार निघतात, दिल्लीहून पॅरिसमार्गे फ्रँकफुर्टला एअर फ्रान्सच्या



विमानाने प्रवास होतो. अरुण कोल्हटकर दिलीप चित्रेही बरोबर असतात. आर. के. नारायण, अनंत मूर्ती, निर्मल वर्मा, विष्णू खरे, तमीळ भाषक अशोक मित्र इ. लेखकही या दौऱ्यात असतात. दि. १ ते ६ ऑक्टोबर बुकफेअर असते. या बुकफेअरचे वर्णन, तपशील दया पवार यांनी दिलेले आहेत. दिलीप चित्रे तेथील टीव्हीच्या मुलाखतीत सांगतात की ''आम्हाला पैसे आठ दिवसांच्या खर्चासाठी फक्त दिले आहेत.'' तेव्हा तेथील लोक थक्क होतात. (खरे म्हणजे ५०० मार्क्स हे केवळ चहापाण्यासाठी होते ही अंदर की बात दया पवार सांगतात).

बुकफेअर संपल्यावर दहा दिवसांचा जर्मनीचा फेरफटका होतो. बंगाली लेखिका महाश्वेता देवी आणि नवभारत दैनिकाचे विष्णू खरे हे बरोबर असतात. तिकिट लावून या तिघांचे कार्यक्रम होत. कार्यक्रमामागे २०० मार्क्स मिळत. त्यामुळे जर्मनी दौऱ्यानंतर पॅरिस व लंडन या शहरांना भेट देण्याचा कार्यक्रमही दया पवार ठरवतात. दि. १५ ऑक्टोबरला ते पॅरिसला पोचतात. आयफेल टॉवर, म्युझियम, आर्ट गॅलऱ्या, राजवाडे वगैरे प्रेक्षणीय स्थळे पाहतात. कवी व प्रकाशक आदिल जसावाला यांची पत्नी फ्रेंच आहे. तिचा पाहुणचार होतो. नाइट क्लब, सेक्स शॉप्स, यांचीही चव चाखण्याची संधी मिळते.

सिद्धार्थ कॉलेजमधील बागुल नामक मित्र लंडनला असतात. त्यांच्याकडे दया पवार डेरा टाकतात. बागुलांची पत्नी पंजाबी. नर्स. दोन मुले. आटोपशीर संसार. परंतु बागूल पतिपत्नी कामात असल्याने मॅपवरून लंडनचा फेरफटका दया पवारांनी एकट्याने केला. ब्रिटिश म्युझियम, हाइड पार्क, पिकॅडली सर्कस, मादाम टुसाचे मेणाचे पुतळे, हिल टॉवर किल्ला व तुरुंग, इ. स्थळे ते पाहतात. बर्मिंगहॅममधील बौध्द मेळाव्यालाही दया पवार उपस्थित राहतात. श्रीमती रंजना ॲश या आशीयन सोसायटाच्या वतीने लंडन युनिव्हर्सिटीत दया पवार यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम दि. २६ ऑक्टोबरला ठेवतात. लंडनचे महाराष्ट्र मंडळ मात्र दया पवारांची जराही दखल घेत नाही. दया पवारांना त्यामुळे काहीसा रागही येतो. ''केवळ मी दलित असल्यामुळे तर हा दुरावा नसेल ना! आपण जर जोशी, कुलकर्णी, फडके, देशपांडे, गडकरी असतो तर आपला महाराष्ट्र मंडळात सन्मान नक्कीच झाला असता, असे मनोमन वाटू लागले.'' (पृष्ठ ८१)...'' अलीकडे मला जेव्हा पद्मश्री मिळाली तेव्हा लंडनच्या महाराष्ट्र मंडळाने अभिनंदनाचे पत्र पाठविले, तेव्हा त्यांच्या कौटिल्य नीतीची गंमत वाटली.'' (८१) अशीही पुस्ती दया पवार जोडतात.

हा असा 'एकला चलो रे' या पुस्तकातला म्हटले तर आत्मशोध, म्हटले तर परदेशातील सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाचा शोध. दया पवार हे तसे प्रकृतीने शांत व समंजस; सौजन्यशील आणि नेमस्त. 'दलित' म्हणून आपल्याला मिळणारी वागणूक पक्षपातीपणाची किंवा उपेक्षेची असली तर ते खवळून उठत नाहीत. अमेरिकेच्या दौऱ्यातील एका घटनेविषयी लक्ष्मण माने आणि दया पवार या दोघांच्या प्रतिक्रियांमधील फरकावरून

त्यांच्या प्रकृतीतील फरक लक्षात येईल." न्यूयॉर्कला भास्कर जोशी यांनी या दोघांना जेवायला बोलावले. माने व पवार हे शहाण्णव कुळीचे असावेत, म्हणून त्यांनी भोजनाचे निमंत्रण दिले असावे. गप्पा मारताना जेव्हा एक कैकाडी व दुसरा महार आहे हे लक्षात आले तेव्हा विटाळ होईल या कल्पनेने भास्कर जोशी यांनी भोजन दिले नाही." असे लक्ष्मण माने यांनी सकाळमधील लेखात म्हटले. दया पवार यांना या संदर्भात काही जणांनी छेडले. "तुम्ही जेवणाच्या टेबलाशी बसलात आणि जेव्हा जोशींना तुमची जात कळली तेव्हा तुम्हाला त्यांनी पंगतीवर उठवले हे खरे आहे का?" असा प्रश्न विचारला. दया पवार या घटनेमागचे सत्य सांगताना म्हणतात, "एकच घटना आम्ही दोघांनीही पाहिली. पण समजून घेण्यात किती घोटाळा! आजचा जो इतिहास वाचला जातो तो जसा चालत आलाय तो खराच असतो काय? कोणते नॉर्म त्याला कलाटणी देतात. जोशी हा ब्राम्हण म्हणून काळ्या रंगात त्याला रंगवावे असे मला वाटत नाही. न्यूयॉर्कमधला हा ब्राह्मण विटाळ पाळत असेल यावर माझा विश्वास बसत नाही. आपल्याला हीच घटना कशी बरं दिसली? त्यावेळीही लक्ष्मणास जे वाटलं ते मला कसं वाटत नाही ह्याची मतं लक्ष्मणला मी ऐकवलेली. आमच्या होस्टतर्फे जोशींचं भोजनाचं निमंत्रण मिळालेलं .... संध्याकाळी कार्यालयात जातो. जोशी मोठ्या दिलखुलासपणे गप्पा मारतात. संध्याकाळी कार्यालयात जातो. जोशी मोठ्या दिलखुलासपणे गप्पा मारतात. आदल्या दिवशी कंपनीच्या वतीनं आम्हांला चायनीज भोजन देण्यात जोशींनीच पुढाकार घेतलेला. त्या दिवशी बर्फ पडत असतं.. जोशींच्या पत्नी येतात. त्याही वयस्कर. या वयातही बाई शिवणकामाच्या मशीनवर काम करतात. जोशींना तासाला ३० डॉलर मिळतात तर बाईंना २५ डॉलर.. मला बाईंची कमालीची कीव वाटत असते. बाईंचं व जोशाचं एका कोपऱ्यात काय बोलणं झालं कुणास ठाऊक. ते दोघे घरी जाण्यास निघतात.. ते घरी गेल्यावर लक्ष्मण आपल्या मनातली (लेखात व्यक्त केलेली) शंका सांगतो. मी त्याला सांगतो – बाबारे, एवढी थकूनभागून आलेली बाई. घरी जाऊन जेवणाची व्यवस्था कशी करेल? काही घरगुती अडचणी असतील. आपल्याही घरी असं कधी होत नाही का? आपण मोठ्या हौसेनं मित्रांना जेवायला बोलवावं आणि बायको वैतागलेली! माझं म्हणणं लक्ष्मणला पटत नाही. पण बातमी वाचल्यापासून माझं मन मला खात असतं. सत्या सांगावं असं वाटतं. लक्ष्मणला त्याच्या चष्म्यातून जे सत्य दिसलं तेच मला दिसावं असं नाही."

हे सत्य जाहीरपणे सांगितले तर आपलंच गणगोत आपल्यावर शस्त्र उपसेल, आपण टोळीवाले नसल्याने आपल्याला कावळयाच्या पिलासारखं टोचून टोचून जर्जर करतील व म्हणतील, "आम्ही म्हणत होतो ना की हा प्रतिगामी आहे!' (पृष्ठ ३५)

दया पवार हे सर्व आपल्यातल्या 'दगडू मारुती पवार'ला सांगतात. दगडू मारुती भोवती तेजाचं वलय नाही. 'दया' मागे ते आहे. त्यामुळे काय धिंडवडे निघतात! टोळीबाहेर जगण्याचं धैर्य मात्र दगडू मारुतीमुळे येते; हेही दया पवार कबूल करतात. (पृष्ठ ३६)



या घटनेचा संदर्भ देऊन पुढे दया पवार म्हणतात, "न्यूयॉर्कमधील ब्राम्हणाने विटाळ धरला असावा या लेखाने महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर खळबळ उडवून दिली होती. त्यावेळी मला मात्र तसे वाटले नव्हते. मी एका लेखात खुलासा केला होता. ज्याला आपण खाण्यापिण्यात विटाळ मानतो तसे आता युरोपात नसले तरी आपण कोणत्या सांस्कृतिक बेटावरचे आहोत ह्याची विभागणी तेथेही होत असावी. नाहीतर बागुल, हिरेकर या मंडळींनी तरी आपल्याबद्दल आपुलकी का दाखवावी? बागुल, हिरेकर हे आपल्या जातीचे आहेत म्हणून त्यांनी आपणास जवळ केले असावे हा विचार मनात आल्यावर मी गलबलून गेलो.' (पृष्ठ ८१)

लंडनमध्ये हिरेकरांबरोबर डॉ. आंबेडकर जेथे शिकले, त्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिकल अँड पोलिटिकल सायन्स या संस्थेला दया पवार भेट देतात. तेथे डॉ. आंबेडकरांचा फोटो लावलेला दिसतो तेव्हा त्यांचा ऊर अभिमानाने भरून येतो. "एक शूद्र अभिमानाने विद्वत्तेच्या क्षेत्रात येथे तळपतो, ही गोष्ट इतिहासाचे चक्र बदलणारी वाटली असे ते म्हणतात. (पृष्ठ ७७)

लंडनमध्ये मोठ्या संख्येने अस्पृश्य कुटुंबे राहतात; त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारलेला आहे. त्यांच्या संस्थेतर्फे संघर्ष नावाचे मासिक निघते. त्या मासिकात भारतातील अस्पृश्यांवर होणाऱ्या अत्याचारांबाबतची जंत्रीच त्यांना दिसते. बौद्धांच्या बर्मिंगहॅमच्या मेळाव्यात चारशेवर स्त्रीपुरुष हजर असतात. भीम पत्रिका या नियतकालिकाचे संपादक एल्. आर. बाली हे तेथे मदतीसाठी आवाहन करतात तेव्हा त्यांच्यासमोर पौंडांचा ढीग लागतो. हे पाहून पवार म्हणतात, "पण मी काही मागितले नाही. केवळ येथील बौद्ध चळवळ पहावी म्हणून मी आलोय असे म्हटल्यावर तेथील कार्यकर्ते माझ्याकडे नवलाने पाहात राहिले. बालींसारखी माणसे परदेशातून आपल्या अनुयायांकडून केवळ पैसे गोळा करण्यास तर येत नसावीत ना अशी शंका मला आली. कारण तेथून बाली अमेरिकेला जाणार होते." (पृष्ठ ७८)

लंडनमध्ये राहणारा ब्रिटिश कौन्सिलमध्ये काम करणारे बागुल हे महाराष्ट्रीयन; त्यांची पत्नी पंजाबी. पण दोघेही पूर्वाश्रमीचे अस्पृश्यच. तरी त्यांच्या प्रेमविवाहाला मुलीच्या पालकांकडून विरोध झाला. लंडनमध्ये राहूनही जातीचा तिढा सुटला नाही. लग्नाला बाईंचे नातेवाईक हजर नव्हते." अशीही माहिती दया पवार देतात.

निग्रोंच्या अवस्थेचेही लंडन-न्यूयॉर्कमध्ये पवार अवलोकन करतात. (पृष्ठ ७३, ३१, ३२, ३३) "जाता येता निग्रो बघायचो. ते आपल्याच धुंदकीत. जवळपास प्रत्येकाच्याच हातात दारूची बाटली. चालताना डुलतच चालायचा. त्याच्या मनात कुठेतरी जाझ संगीत वाजत असावे. बाहेरच्या जगाशी त्याचे भान नसायचे... हार्लेमच्या नाक्यावर

गेल्यावर गोलपिठ्याच्या नाक्यावर उभं असल्यासारखं वाटलं. काही जोडपी एकमेकांना चिकटलेली काही ठिकाणी जुगाराचे अड्डे.... चाळीस टक्के निग्रो हे बेकार आहेत. त्यांना कामधंदा नाही. बेकारभत्ता मिळत असल्याने काम न करण्याची प्रवृत्ती निग्रोंमध्ये वाढते आहे. पैसे कमी पडले तर ते हंटिंग करतात. चोऱ्याचपाट्या करतात. खिशावर डल्ला मारतात. आश्चर्य म्हणजे तेथील निग्रो हा भारतीय व पाकी यांची घृणा करतो. भारतीय व पाकी हेही निग्रोबद्दल कडवटपणे बोलतात.."

या प्रवासवर्णनात स्थळांच्या वर्णनापेक्षा दया पवार यांच्या प्रवासातील अनुभवांनाच महत्त्व आहे. परदेशप्रवासाचे थ्रिल, अजाणतेपणामुळे होणारे फटफजितीचे प्रसंग, आपल्यापेक्षा वेगळ्या जीवनशैलीची दिसणारी वैशिष्ट्ये आणि त्या अनुभवांना सामोरे जाताना करावी लागणारी कसरत यांच्या मनमोकळ्या नोंदी जागोजागी आल्यामुळे एखाद्या परिचिताने आपले अंतरंग खुले करावे तशी जवळीक हे प्रवासावरचे लेख वाचताना जाणवते.

*एकला चलो रे, पृष्ठे ८१, पन्नास रुपये*


## आमची नवीन प्रकाशने

| | |
|---|---|
| शालेय व्यवस्थापन, प्रशासन व संघटन | डॉ. अरविंद दुनाखे |
| प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान | डॉ. अरविंद दुनाखे |
| द्वितीय भाषा हिंदी : विषयज्ञान व अध्यापन पद्धति | डॉ. अरविंद दुनाखे |
| पर्यावरण शिक्षण | डॉ. के. म. भांडारकर |
| सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र | डॉ. के. म. भांडारकर |
| अध्ययन उपपत्ती व अध्यापन | डॉ. सत्यवती राऊळ |
| शास्त्र आशययुक्त अध्यापन पद्धती | डॉ. बोदार्डे, प्रा. कदम |
| **आगामी** | |
| लोकसंख्या शिक्षण | डॉ. के. म. भांडारकर |
| शैक्षमिक संशोधन | डॉ. के. म. भांडारकर |
| शैक्षणिक संप्रेषणाची मूलतत्त्वे | डॉ. के. म. भांडारकर |
| संगणक : शिक्षण व शिक्षक | डॉ. मीनाक्षी बरवे |
| गुणात्मक संशोधन | प्रा. ब. बि. पंडित |
| शैक्षणिक आयोग व समित्या | प्रा. मीनल नरवणे |
| शिक्षणाचे अधिष्ठान | प्रा. गाजरे, डॉ. पाटील, प्रा. चिटणीस |

**नूतन प्रकाशन**

२१८१, सदाशिव पेठ, टिळक पथ, पुणे ३०. **फोन : ५३६९२४**




**विज्ञानाच्या मदतीने होणाऱ्या गुन्हेगारीवर प्रकाश टाकणाऱ्या रहस्यपूर्ण विज्ञानकथा**

# खिडकीलाही डोळे असतात

**डॉ. बाळ फोंडके**

'खिडकीलाही डोळे असतात' हा डॉ. बाळ फोंडके यांच्या विज्ञानाधिष्ठित रहस्यकथांचा संग्रह.

पोलिस कमिशनर अमृतराव मोहिते आणि फोरेन्सिक मेडिसिनचे तज्ज्ञ डॉ. कौशिक या दोन व्यक्तिरेखा प्रसिद्ध विज्ञानकथाकार डॉ. बाळ फोंडके यांनी निर्माण केल्या असून, या जोडगोळीद्वारे अनेक गूढ गुन्ह्यांचा उलगडा करून दाखवला आहे. डॉ. कौशिक हे विज्ञानाच्या मदतीने या गुन्ह्यातील उपलब्ध पुराव्याची छाननी करतात आणि नेमक्या गुन्हेगाराचा तपास लावतात. आणि त्याच्या उलगड्याचे श्रेय मात्र पोलिस कमिशनरना उदारपणे देऊन टाकतात. या त्यांच्या उदारपणामुळे कधी कधी अमृतरावांना लाजल्यासारखे होते; आणि डॉ. कौशिक यांजकडे जाऊ नये असेही वाटते. ते जाण्याचे टाळतातही. तेव्हा न उलगडलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात होणाऱ्या टीकेमुळे अमृतरावांवर मानसिक ताण पडतो; तो पाहून त्यांची पत्नीच त्यांना कौशिक भावजींकडे जाण्याला प्रवृत्त करते, आणि आपल्या नवऱ्याला नामुष्कीतून वाचवण्यात पुढाकार घेते. या जोडगोळीमुळे अनेक गुन्हे अगदी अनपेक्षित अशा प्रकारे उलगडतात. पोलिस खात्याच्या चाकोरीबद्ध कार्यप्रणालीमुळे कुठलाही गुन्हा घडला की त्याचा पंचनामा करून त्याचे स्वरूप, पुरावे, संशयित व्यक्ती व गुन्ह्याचा हेतू, परिस्थितीनिदर्शक पुरावे, बोटांचे ठसे वगैरे बाबींची काटेकोर नोंद होते. परंतु या चौकटीतून लक्ष जातेच असे नाही. डॉ. कौशिक हे अशा चाकोरीबाहेरच्या गोष्टींची नोंद घेऊन वरकरणी निरुपद्रवी व असंबद्ध वाटणाऱ्या तपशीलांद्वारे आपल्या वैज्ञानिक ज्ञानाच्या बळावर त्या गुन्ह्याचा छडा लावतात आणि बिनतोड युक्तिवाद करून गुन्हेगारालाही अवाक् करून सोडतात. विज्ञानातील काही विशेष निरीक्षणांचा उपयोग करून गुन्हेगारापर्यंत

पोचण्याचा हा प्रकार 'रहस्यविज्ञानकथा' अशा नावाने ओळखला जाणे सयुक्तिक ठरेल. विज्ञानातील खाचाखोचांचे ज्ञान असेल तरच अशा कथा लिहिता येतील. एरव्ही नाही.

बाळ फोंडके यांनी या कथांसाठी वापरलेल्या मध्यवर्ती वैज्ञानिक कल्पना काही वेळा अत्यंत साध्या आहेत तर काही वेळा अगदी अभिनव. त्यांनी स्वतःच कल्पनेने शोधलेल्या. वास्तवात नसलेल्या. 'खिडकीलाही डोळे असतात' या नावाचीच कथा घ्या.

जुहूतील नामवंत डॉ. सतीश नागपाल यांची पत्नी नीता ही सत्तावीस जुलै रोजी आपल्या बंगल्यात मृतावस्थेत सापडते. तिच्या गळ्यावर आवळल्याच्या रागीट खुणा आणि चेहऱ्यावर भीती साखळलेली स्पष्ट दिसते. मरण जवळ येऊनही तिनं फारशी धडपड केल्याचे जाणवत नव्हते. बेडरुमचे दार आतून बंद होते; खुनी घरात आलाय हे तिला ठाऊक होते. तिने स्वतःला वाचविण्यासाठी भाऊ रवीन्द्र खुराना याला फोन केला होता. "भैय्या, तू लवकर ये. तो आज मला मारून टाकणार आहे ते बघ, दार फोडायला बघतोय तो, भैय्या." आपल्या नवऱ्याचे सतीशचे दुसऱ्या एका नर्सबरोबर संबंध असल्याचे तिने पाहिले होते. सतीश तिला माहेरहून पैसे आणण्यासाठी सतावत असे. परंतु प्रत्यक्षात खून झाला तेव्हा डॉ. सतीश आपण दुसरीकडेच असल्याचे दाखवतो. डॉ. सतीश स्वतःच पोलिसांना फोन करतो, आणि खुनाची खबर देतो. तिच्या भावाची खात्री असते की हा खून सतीशनेच केला आहे.

पोलिस बुचकळ्यात पडतात. सतीश खरोखरच निरपराध असला पाहिजे किंवा स्वतःविरूद्ध काहीही पुरावा राहिलेला नाही याची खात्री करून घेतलेला अट्टल गुन्हेगार असला पाहिजे. खून झाला त्यावेळी आपण नीलिमा नामक पेशंटबरोबर होतो असा त्याचा दावा असतो. त्यामुळे अमृतराव काहीच करू शकत नव्हते. डॉ. कौशिक जेव्हा खून झालेल्या बेडरूमची तपासणी करतात तेव्हा त्या खोलीला असणारी स्लोग्लासची खिडकी त्यांचे लक्ष वेधून घेते. या खिडकीची ते डॉ. सतीश नागपालजवळ चौकशी करतात. "मीही अशा खिडकीच्या शोधात आहे. तुम्ही ही कुठून घेतली? केवढ्याला घेतली? डॉ. सतीशने हिमाचल प्रदेशातील डोंगराळ भागातून ती खिडकी आणल्याचे सांगितल्यावर डॉ. कौशिक स्वतः हिमाचल प्रदेशात जाऊन तसलीच एक खिडकी विकत घेतात. त्याचवेळी डॉ. नागपालच्या खिडकीविषयी चौकशी करतात. आणि परतल्यावर अमृतराव यांना सांगतात. या खुनाचा उलगडा होण्यासाठी एक वर्षभर–म्हणजे सत्तावीस जुलैपर्यंत थांबावे लागेल. नीताचा खुनी सज्जड पुराव्यासकट त्या दिवशी हाती येईल असे सांगतात.

ते असे का सांगतात?

स्लोग्लासचे एक वैशिष्ट्य असते.

डोंगराळ प्रदेशात मिळणाऱ्या काही स्फटिकांपासून घासून घासून तेथील कारागीर ही काच बनवतात. तेथील निसर्गसौंदर्य ते या काचेत बंदिस्त करून ठेवतात. वेगवेगळा



काळ प्रकाश गोठवण्याची क्षमता या काचेत असते. या काचेत प्रकाश दोन्ही बाजूंकडून शिरतो. बाहेर दिसणारं निसर्गदृश्य तिच्यात अडकून राहतं तसंच आतल्या बाजूला घरात घडणारी घटनाही तिच्यात बंदिस्त होऊन बसते; आणि त्या बंदिस्त काळाची मुदत झाल्यावर दिसू शकते. डॉ. सतीश नागपालच्या स्लोग्लास खिडकीचा बंदिस्त काळ हा एक वर्षाचा असल्याचे हिमाचल प्रदेशातील विक्रेत्याकडून कळल्यानेच डॉ. कौशिक २७ जुलै रोजी खून कसा झाला हे त्या काचेवर दिसेल असे ठामपणे सांगतात.

–आणि नेमके तसेच होते. नीताचा खून कसा झाला याचे जणू चित्रपटसदृश चित्रणच त्या काचेवर झाल्याचे लक्षात येते. खुनी कोण याचाही उलगडा होतो.

डॉ. सतीश नागपालला या खिडकीमागचे तत्त्व माहीत नसते; केवळ खूप पैसा आहे म्हणून त्याने ही काच घेतलेली असते. डॉ. बाळ फोंडके 'स्लोग्लास' मधील बंदिस्त काळाच्या संकल्पनेवर भर देऊन खुनाचा उलगडा कसा होऊ शकेल हे दाखवण्यासाठी ही कथा सांगतात. स्लोग्लस आज उपलब्ध नाही.

अशीच कल्पना 'दिसतं तसं नसतं' या कथेत आहे. या कथेतील वीरेंद्रराजे घाटगे पाटील यांच्या वेगळ्या राहणाऱ्या सुनेचा तिच्या घरी भाजून मृत्यू होतो. मृत्यूपूर्व जबानीत ती पोलिसांना सांगते, "माझ्या अंगावर व कपड्यांवर रॉकेल टाकून ते काडी ओढून पेटवण्यात आले; माझ्या सासऱ्यांनी–मामंजींनी हे काम केले."

मृत्यूपूर्व जबाब ग्राह्य धरण्यात येतो; परंतु वीरेंद्रराजे घाटगे सुनेला जाळण्यात आले त्यावेळी तेथून दूर असलेल्या आपल्याच बंगल्यात लिहित बसल्याचे अनेकांनी पाहिलेले असते असे निदर्शनाला आणतात त्यांच्या बंगल्याला भेट दिल्यावर दिवाणखान्यात बसवलेली खिडकी नवी असून तिच्यातून पलीकडचे स्वच्छ दिसते असे डॉ. कौशिक यांना आढळून येते. त्याचबरोबर वीरेंद्रराजे लेसर किरणांचा विशेष अभ्यास करीत आहेत असे म्हणतात; तेव्हा प्रकाशाबाबत लेसरच्या सहाय्याने व्हर्च्युअल रिॲलिटी – म्हणजे सत्याभास निर्माण करता येतो, जे तिथं नाही ते तिथं दाखवता येतं, आधुनिक मयसभाच लेसर किरणांमुळे तयार होते असाही त्यांच्या संभाषणात उल्लेख येतो. ती खिडकी नवीन आहे; आणि स्त्रीमुक्तिवाल्यांची दगडफेक केल्याने आधीची काच फुटली असाही निर्देश वीरेंद्रराजे करतात.

वीरेंद्रराजे यांना खिडकीतून त्या खुनाच्या वेळी पाहणारे जे साक्षीदार पुढे येतात त्यांना प्रश्न विचारून डॉ. कौशिक हे त्यातील सत्यता काय असावी हे जेव्हा दाखवून देतात, तेव्हा खून कोणी केला हे स्पष्ट होणे सोपे जाते. साक्षीदारांपैकी एकजण सांगतो, मी पाहिले तेव्हा खिडकीची काच निळसर हिरवी होती. आत लाइट नव्हता. फक्त टेबलाशी बसलेले वीरेंद्रराजे दिसत होते. त्यांचा हात हलत होता. मी दार वाजवले पण कोणीच उघडले नाही.

डॉ. कौशिक या घटनेचा उलगडा करताना होलोग्रामचे तत्त्व वापरून, लेसर

किरणांद्वारे त्रिमिती चित्राकृती करून आपण त्या दिवाणखान्यात असल्याचा आभास निर्माण करतात व त्यावेळीच सूनेच्या घराकडे जाऊन कार्यभाग साधतात – वीरेंद्रराजांचे बिंग फोडतात.

अशाच वैज्ञानिक कल्पनांची गुंफण या संग्रहातील कथांची रंजकता व वाचनीयता वाढवते. या कल्पना आहेतही मोठ्या वैविध्यपूर्ण.

चंद्रगुप्ताच्या काळातील अंगठी खरी की खोटी हे ओळखण्यासाठी डॉ. कौशिक स्पेक्ट्रोग्राफचा वापर करून तिचा 'फिंगर प्रिंट' घेतात आणि त्यातील सोन्याचा खरेखोटेपणा अमेरिकेतील स्मिथसोनियन संस्थेतील डेटाबेसवरून निश्चित करतात.

पेसमेकर बसवलेल्या शेटजींना चालल्या कारमध्येच हृदयविकाराचा झटका येऊन वैद्यकीय मदन मिळूनही मृत्यू येतो. हा खून आहे असा संशय त्यांचा मुलगा व्यक्त करतो. तो खून आपल्या सावत्र आईने केला आहे असेही तो म्हणतो. तेव्हा त्याचे म्हणणे पोलिस कमिशनरना पटत नाही. ही सरळ सरळ हृदयविकाराने मृत्यू आल्याची घटना आहे असे डॉक्टरही म्हणतात. अशा स्थितीत डॉ. कौशिक या प्रकरणातील सत्य शोधून काढतात. हा झटका आला त्यावेळी गाडीत शेटजींना सेल्युलर फोन आलेला असतो हे त्यांना कळते. डॉक्टरांनाही हे माहीत नसते. पेसमेकरच्या कामात सेल्युलर फोनच्या सिग्नलमुळे अडथळा येतो, त्याची फ्रिक्वेन्सी धोकादायक असेल तर हार्ट अटॅकही येऊ शकतो – म्हणजे कृत्रिमपणे आणवता येतो, या वैज्ञानिक वास्तवाचा वापर करून डॉ. कौशिक खऱ्या खुन्याचा पत्ता लावतात.

बागेत असणाऱ्या चार व्यक्तींपैकीच कोणीतरी अर्देशीर बलसारा या उद्योगपतीचा खून करते. तो कोणी केला असावा हे ठरवण्यासाठी डॉ. कौशिक त्या बागेतील ऱ्होडोड्रेन्ड्रॉन या वनस्पतीवर त्या खुनी व्यक्तीचा पाय पडला असावा हे लक्षात घेऊन, झाडाच्या संवेदनांचे मोजमाप करणारे यंत्र आणून, संशयित व्यक्तींना त्या झाडाजवळ उभे करून पाहतात. या यंत्राच्या चाचणीत खुनी व्यक्ती झाडाजवळ आली असताना त्या झाडाची संतापाची प्रतिक्रिया दिसली. त्यावरून डॉ. कौशिक खऱ्या खुन्याला पोलिसांच्या ताब्यात देतात.

–अशा अनेक शास्त्रीय संकल्पनांचा वापर केल्यामुळे या कथांचे वाचन थरार कथेप्रमाणेच आनंद देते आणि वैज्ञानिक ज्ञानातही भर टाकते.

***खिडकीलाही डोळे असतात, पृष्ठे ११२, एकशेदहा रुपये***


**नवचैतन्याचा झरा**

**डॉ. बाळ फोंडके**

*किंमत पासष्ट रुपये*

*मानवाचे जीवन ग्रासून टाकणाऱ्या भयंकर रोगांवर लसींमुळेच मानवाला विजय मिळवता आला आहे. लसींचा आजवरचा प्रवास व भावी काळातील कार्य याची सुबोध ओळख.*




**मेंदू आणि मन या क्षेत्रात चाललेल्या अद्ययावत संशोधनाची विस्मयकारक झलक**

# आत्मवेध

**निरंजन घाटे**

मानवी मेंदूची रचना, मानवी मेंदू आणि सर्जनशीलता, मानवी मेंदू आणि रासायनिक द्रव्यांचे त्यावर होणारे परिणाम, स्त्री आणि पुरुष यांच्या मेंदूतील फरक, मेंदूचे विकार आणि त्यावरची औषधे, मेंदू-मन आणि आरोग्य, मेंदूतील विद्युत् लहरी आणि मानवी स्वभाव, संगणकाच्या सहाय्याने मनाचा शोध घेण्याचे प्रयत्न, मेंदूची उत्क्रांती अशा विषयांच्या अनुरोधाने मानवी मेंदूविषयी गेल्या काही वर्षात जगभर संशोधन चालले आहे; त्याबद्दलची थोडीफार उत्कंठावर्धक माहिती देणारे निरंजन घाटे यांचे लेख आत्मवेध या पुस्तकात संकलित करण्यात आले आहेत. मेंदू आणि मन यांच्या स्वरूपाचा उलगडा व्हावा, त्यांची कार्यपद्धती लक्षात यावी म्हणून पाश्चात्य प्रयोगशाळांमध्ये अनेक शास्त्रज्ञ आणि संशोधक गेली अनेक वर्षे वेगवेगळे प्रकल्प राबवत आहेत. त्यातून अनेक बाबींवर प्रकाश पडत आहे.

उदाहरण म्हणून पक्ष्यांच्या झोपेबाबतचे एक नवे निरीक्षण घ्या. पक्ष्यांना झोप येते की नाही? ती किती वेळ येते? पक्षी कुठे झोपतात? घरट्यात? की उडता उडताही? याबाबत न्यूयॉर्क टाइम्समध्ये फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात आलेल्या बातमीत इंडियाना स्टेट युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी काढलेला एक निष्कर्ष देण्यात आला आहे. पक्षी झोप घेतात तेव्हा एक डोळा उघडा ठेवतात; आणि त्यांच्या मेंदूचा निम्मा भाग झोप घेतो आणि उरलेला भाग जागाच असतो. शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी पक्ष्यांनी ही निद्रापद्धती आत्मसात केली आहे. 'युनिहेमिस्फिरिक स्लोवेव्ह स्लीप' मुळे पक्षी भावी संकटापासून आपला बचाव करु शकतात. आपल्या मेंदूच्या काही भागाला निद्राधीन करून विश्रांती देण्याची आणि उर्वरित भाग जागृत ठेवून स्वसंरक्षण करण्याची ही विशिष्ट सिद्धी पक्ष्यांनी लाभलेली आहे,

हे 'नेचर'या मासिकाच्या ताज्या अंकातही देण्यात आले आहे. शत्रूचे भय जितके जास्त, तितकी युनिहेमिस्फिरिक झोप कमीजास्त घेण्याची प्रवृत्तीही त्यांच्यात दिसते. माणसाचा मेंदूही अशाप्रकारे एकाच वेळी जागा व निद्रिस्त असा असतो का - याचाही आता नव्याने मागोवा घेणे आवश्यक ठरेल.

माणूस आणि इतर प्राणी यांच्यातील मुख्य फरक म्हणजे माणसाची विचार करण्याची, ज्ञानार्जन करण्याची, वर्गीकरण करण्याची, त्याला शब्दरुपात प्रकट करण्याची त्याने विकसित केलेली क्षमता. विचारप्रक्रियेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी कॉग्निटिव्ह न्यूरोसायन्टिस्ट (जाणीव चेताशास्त्र) इलेक्ट्रॉनिक, रसायन, भाषाशास्त्र इ. क्षेत्रातले तज्ज्ञ प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी हॉपकिन्स विद्यापीठातील टेरी सेजनोस्की यांनी एक नेटटॉक हा संगणक कार्यक्रम विकसित केला आहे. सहा-आठ महिन्याच्या बालकाप्रमाणे आवाज करणारा हा संगणक स्वर व व्यंजने यातील फरक जाणून घेऊ शकतो. निरर्थक शब्द (स्युडो वर्डस) बनवू शकतो. मूल शब्दज्ञान कसे मिळवते ती प्रक्रिया जाणून घेण्यासाठी या संगणक-बालकाची मदत घेण्यात येत आहे.

**मेंदूचे वैशिष्ट्य - नियम न पाळणे हीच मूल प्रवृत्ती**

आजवर विचार प्रक्रियेबाबतचे सिद्धान्त मुख्यत: अंकीय संगणक डोळ्यापुढे ठेवून मांडले गेले. परंतु मेंदूचे कार्य इतक्या एकरेषीय सरळ पद्धतीने चालत नाही हे लक्षात आल्यावर एक चेतापेशी अनेक दिशांनी अनेक चेतापेशींना आणि अनेक चेताप्रणालींना जोडून संदेशवाहक तारांप्रमाणे जाळे निर्माण करीत असते, त्याप्रमाणे जटिलप्रणाली (कॉम्प्लेक्स सिस्टिम) संगणकाद्वारे तयार करून मानवी मेंदूच्या कार्यपद्धतीची माहिती मिळवण्याचा प्रयोग अनेक ठिकाणी चालू आहे आणि माणूस (म्हणजे मेंदू) हा नियम पाळण्याऐवजी नियम न पाळता काम करण्याला सरावलेला आहे असे डेव्हिड रूमेलहार्ट या मानसशास्त्रज्ञाला आढळून आले आहे. माणूस ज्ञानाचे वर्गीकरण करतो, पण तेही अनेकदा स्वयंकेंद्रित असते असे जॉर्ज लॉकॉफ यांचे निरीक्षण आहे. (पृष्ठ ७). मन व शरीर यांचा जवळचा संबंध असतो. परस्परांवर त्यांचा परिणाम होतो. (९)

**मेंदूतील चार लहरी**

मेंदूतील अल्फा, बिटा, थिटा, डेल्टा या चार प्रकारच्या लहरींचे कार्य संशोधकांनी वेगवेगळे कसे चालते यावर प्रकाश टाकला आहे. १८ टक्के व्यक्तींत अल्फा लहरी तीव्र असतात. २० टक्के व्यक्तींत त्या निर्माणच होत नाहीत. अल्फा लहरींची निर्मिती गुंतागुंतीच्या समस्येची उकल करताना थांबते. डोळे उघडले की या लहरी थांबतात. समोरच्या प्रश्नांचं पूर्ण चित्र डोळ्यापूढे उभे राहून एखादा प्रश्न सहज सोडवणे हा प्रकार अल्फा लहरी नसलेल्या व्यक्तींना उत्तम साधतो. (१४) अनेक गुन्हेगारांची अल्फास्फंदने मंदगतीने कायम चालू असतात.



थिटा लहरींमुळे माणसे तापट, आक्रमक होतात. त्यांना विरोध अजिबात सहन होत नाही. ती संशयी, उतावीळ व स्वार्थी असतात.

बिटा लहरी जलदगती असतात. या लहरींचे प्रमाण जास्त असेल त्या व्यक्ती सतत मानसिक ताणाखाली आणि चिंताग्रस्त असतात.

डेल्टा या मंदगती लहरींमुळे माणसे गरीब व मवाळ होतात. त्या व्यक्ती आज्ञाधारक असतात. मेंदूला इजा झाल्यावरही या लहरींचे प्रमाण वाढते. (१५)

मेंदूतील विचारांमुळे या लहरी निर्माण होतात की लहरींमुळे विशिष्ट प्रकारचे विचार मनात येतात यावर आजही संशोधन चालू आहे.

**लेखक कवी-कलावंत यांचा मेंदू वेगळा असतो का?**

काहीच माणसे कलावंत असतात, कलानिर्मिती करतात. इतर माणसे तशी कलानिर्मिती करू शकत नाहीत असे का होते? त्यांच्या मेंदूत काही वेगळेपण असते का? कलानिर्मितीची प्रेरणा कशामुळे होते? काही प्रज्ञावंत एखाद्या क्षेत्रात श्रेष्ठ असतात, पण इतर बाबतीत कमालीचे खुळे असतात. काही जण लहान वयातच अचाट निर्मिती करून जातात. बुद्धिमत्ता आणि प्रज्ञा यांचा संबंध आहे का? प्रतिभा व सृजनशीलता यांचा संबंध कसा लावायचा?

हार्वर्ड विद्यापीठात डेव्हिड पर्किन्स हे मानसशास्त्रज्ञ प्रॉजेक्ट झीरोद्वारे सृजनशील व्यक्तींच्या मेंदूतील कल्पनांचे भांडार वेगळे असते का याचा शोध घेत आहेत. (१९). त्यांचे उत्तर नकारार्थी आहे. साक्षात्कार वा उत्स्फूर्त-अंत:स्फूर्त ज्ञानाचे प्रकार दुर्मिळ असतात. माणसाचं व्यक्तिमत्त्व आणि विचारधारा यांचा सृजनशीलतेवर परिणाम होतो असे ते मानतात.

सृजनाच्या दृष्टीने अंत:स्फूर्तीचे महत्त्व विशेष दिसते. तर्कशुद्ध विचारशक्ती व सृजनशीलता यांचा संबंध जोडता येत नाही असे फ्रँक बॅरनचे ४० वर्षांच्या अभ्यासानंतरचे निरीक्षण आहे. (१९) अंत:स्फूर्ती ही तर्कशुद्ध विचारसरणी, कार्यकारणभाव आणि वाचिक संपर्कक्षमता यावर मुळीच अवलंबून नसते. तर ती भावना आणि विचार यांच्या वैफल्यातून निर्माण होते; असे ते म्हणतात.

डावा मेंदू बोलणे, लिहिणे, विचार करणे, वाचणे अशा बौद्धिक गोष्टींचे नियंत्रण करतो, तर उजवा मेंदू अमूर्त गोष्टी, भावना व दृकसंवेदनांशी संबंधित असतो हे वर्गीकरण पर्किन्सना मान्य नाही. (२०); पण स्टॅनफोर्ड विद्यापीठातील चेताशास्त्रज्ञ कार्ल प्रिब्रॅम यांना हे वर्गीकरण वास्तववादी वाटते. सृजनशीलतेचा विचार करताना मागता मेंदू व पुढचा मेंदू यांचा अभ्यास हवा असे ते सुचवतात.

मेंदूचे तीन मुख्य भाग असतात. मोठा मेंदू (फोरब्रेन-पुढचा मेंदू), मिडब्रेन (मधला मेंदू), हाइंड ब्रेन (लहान मेंदू, मागचा-पश्च-मेंदू) पुढच्या मेंदूचे डावा व उजवा असे दोन

पोटभाग, आणि त्यांचे बाह्यक आवरण तसेच लिंबिक प्रणाली यांचा समावेश होतो. बाह्यका (कॉर्टेक्स)चे चार भाग असतात. पुढचा अधोबाह्यक कपाळाच्या जागी असतो – त्याद्वारे स्थळकाळाचे भाग येते. भूत व भविष्यकाळातला फरक करता येतो अधोबाह्यक नसता तर आपण फक्त वर्तमानकाळातच जगत राहिलो असतो. (२०) या अधोबाह्यकाचा व सृजनशीलतेचा संबंध असावा असे कँडीस पर्ट याचे मत आहे. त्यावर अजून संशोधन चालू आहे.

कँडीस पर्ट यांना वाटते की प्रत्येक माणसात एक विश्वात्मक आध्यात्मिक जाणीव (स्पिरिच्युअल कॉँशसनेस) असते, समग्रतेची जाणीव असते, मेंदू हा मनाचा निर्माता नसून मनाच्या संदेशाचा ग्राहक असतो. (२१)

मेंदूतील चेतापेशींची संख्या जन्मापासून मृत्यूपर्यंत कायम राहते. या पेशींपैकी ज्यांना इजा पोचते त्या कायमच्या नष्ट होतात. त्यांची जागा भरून घेणाऱ्या दुसऱ्या पेशी नव्याने तयार होत नाहीत. (२४)

सृजनशील व्यक्तीच्या सहा मानसिक वैशिष्ट्यांचे 'स्नोफ्लेक मॉडेल' पर्किन्सनी तयार केले आहे. गोंधळातून मार्ग काढणे त्यांना आवडते. गुंतागुंतीचे प्रश्न सोडवण्याची व तसे प्रश्न हेरण्याची त्यांना आवड असते, वैचारिक कसरती करणे, या व्यक्तींना मानसिक साहसाची आवड असते, अपयशाची भीती वाटत नाही. उलट अपयशावर मात करण्याचा प्रयत्न करीत राहतात. स्वतःच्या निर्मितीकडे तटस्थपणे, त्रयस्थपणे पाहण्याची त्यांची प्रवृत्ती असते, टीका सहन करणाऱ्या व्यक्तींची उत्तरोत्तर अधिक प्रगती होत जाते, निर्मितीची उर्मी ही त्यांची सहजप्रवृत्ती असते. ही या व्यक्तींची वैशिष्ट्ये पर्किन्सनी नमूद केली आहेत. (२६–२८)

सृजनशीलतेचा वेध घेण्यासाठी पेटस्कॅन हे 'पॉझिट्रॉन एमिशन टामोग्राफी' यंत्र तयार करण्यात आले आहे. (२९)

मादक द्रव्ये, एल एस डी, कोकेन यासारख्या रासायनिक द्रव्यांनी मेंदूवर काय परिणाम होतो? त्यांचे नियंत्रण करण्याचे प्रयोग सत्ताधीश का करीत असतात? याचाही मागोवा एका स्वतंत्र प्रकरणात आला आहे. (३१–४४)

केवळ विद्युतस्पंद संगणक म्हणून मेंदूचे स्वरूप नसून ते रसायन निर्मितीचे प्रचंड भांडार आहे अशी खात्री नवीन संशोधनाने पटली आहे. (३७). मेंदूचा शरीराच्या कानाकोपऱ्याशी सतत संबंध असतो. चेतापेशींद्वारे हा संपर्क राहतो. दोन चेतापेशींमध्ये असणारी पोकळी रासायनिक द्रव्याद्वारे भरून काढली जाते. मादक द्रव्यांद्वारे या रासायनिक पोकळीवर परिणाम होऊन, मानवी भावना व विचार प्रक्रिया वृद्धिंगत किंवा शिथिल होऊ शकतात. या मादक द्रव्यांच्या सेवनाने माणूस उदासीन, निष्क्रियही बनू शकतो माणसाचे वर्तन नियंत्रित करता येते. डॉ. अलेक्झांडर टी शुल्गिन यांनी म्हटले आहे, "आज ना उद्या



माणसाची बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, बास–श्रवण–दृष्टी यांची आकलनशक्ती, हुशारी व चलाखी वाढविता येईल अशी रसायने आपल्याला सापडतील; मानसिक विकार–एकटेपणाची जाणीव–दुःखाची जाणीव ही देखील थोपवता येईल. गुन्हेगारी व आत्महत्या यांचे आकर्षण कमी करणारी प्रभावी रसायने तयार करता येतील." (४४)

**स्त्रीचा मेंदू आणि पुरुषाचा मेंदू**

१९८०नंतरच्या संशोधनात स्त्री आणि पुरुष यांच्या मेंदूच्या कॉर्पस कॅलोझम (तंतुपट्ट–मनाची दूरध्वनी यंत्रणा) आमि हायपोथॅलॅमस (अधःस्थली–मेंदूतील उचापती समायोजक व नियंत्रक) या दोन भागात फरक असतो असे आढळून आले आहे. स्त्री आणि पुरुष यांच्या संप्रेरकामधील फरकामुळे त्यांच्या मेंदूच्या कार्यवरही प्रभाव पडतो. एकसारख्या वजनाचे दोन मेंदू घेतले तर त्यातील स्त्रीच्या स्प्लेनियमची रूंदी व क्षेत्रफळ अधिक दिसतं. मेंदूच्या दोन भागांना स्प्लोनियम जोडते. तेव्हा या दोघांच्या मेंदूतील जोडणीही भिन्न असणार असे दलाकोस्ते या संशोधकाचे मत आहे. रॉजर स्पेरी याने त्याला दुजोरा देऊन 'स्लिट ब्रेन वर्क' संकल्पना मांडली. पुरुषांच्या मेंदूचा उजवा भाग प्रभावी असल्याने पुरुषांना अमूर्त विचारात अधिक रस वाटतो. स्त्रियांच्या डाव्या व उजव्या मेंदूत सामंजस्य असल्याने परस्पर सहकार्य व भावनोत्कटता यांचा अधिक आढळ होतो. स्त्री व पुरुष यांच्या मेंदूच्या कार्याच्या पद्धती भिन्न आहेत असे विटेल्सनचे मत आहे.

पुरुष बोलतो तेव्हा त्याच्या मेंदूतील वेर्निक व ब्रोकाक्षेत्रातला रक्तप्रवाह वाढतो; स्त्रिया बोलतात तेव्हा त्यांच्या डाव्या–उजव्या भागातील इतरही क्षेत्रे रक्तप्रवाहाची खळबळ दाखवतात. याचा अर्थ स्त्रिया मेंदूतील बऱ्याच भागांचा वापर करून बोलतात. म्हणून स्त्रियांच्या बोलण्यात कावेबाजपणा जास्त असतो असे सेसिल नेलोर यांचे मत झाले. (५२)

मेंदूचा खरा नियंत्रक म्हणजे हायपोथॅलॅमस (अधःस्थली). हाही स्त्री–पुरुषांच्या बाबत थोडा भिन्न असतो. स्त्री–पुरुषांच्या संप्रेरकस्त्रावातही गुणात्मक व संख्यात्मक फरक असल्याने त्यांच्या लैंगिक प्रेरणांमध्येही फरक पडतो. (५३)

**मन आणि मेंदू**

मेंदू व मन यांचा नेमका संबंध काय? मेंदू नाही तर मन नाही; मेंदू व मन हे अभेद्य आहेत. ज्ञानेंद्रियांकडून आलेली माहिती, आपल्या चेतापेशीतील विद्युतप्रवाह आणि संप्रेरके यांच्या परस्परसंबंधांना स्मरणाची जोड मिळून मन तयार होते. भाषेमुळेही मनाची निर्मिती व प्रगल्भता वाढली असावी. पेटस्कॅनमुळे मेंदूच्या अंतर्भागाचे कार्य कसे चालते हे आता थोडेथोडे उलगडू लागले आहे. संगणकाच्या सहाय्याने मनाचा शोध घेण्याचाही प्रयत्न जारी आहे. मेंदूच्या अभ्यासाची पद्धत मार्क मिंटन याने तयार केली आहे (८३). ग्लुकोज हे मेंदूचे अन्न आहे. रक्तावाटे ग्लुकोज मेंदूपर्यंत पोचते. मन भूत, वर्तमान, भविष्य अशा तीनही काळात स्वैरसंचार कसे करू शकते? हेही एक गूढच आहे.

याच प्रकारे विचार कृतीत आणणारी यंत्रे, मेंदूवरील औषधयोजना, थापा मारणाऱ्यांच्या मेंदूची रचना, संमिश्र जाणीवांची सायनेस्थिशिया ही विचित्र व्याधी, लैंगिक आचरणात मेंदूच्या रचनेचे स्थान, स्त्रीपुरुषाच्या आकर्षणाचे केंद्र, घटस्फोटाची कारणमीमांसा, आत्महत्येची प्रवृत्ती या संबंधीही मेंदू-मन यांच्या अभ्यासातून जाणवलेली काही निरीक्षणे निरंजन घाटे यांनी नोंदवलेली आहेत. आपल्या वर्तणुकीचा स्वत:लाच कधी कधी विस्मय वाटतो, इतरांच्या वागण्याचेही कोडे वाटते. मनाचे हे खेळ समजण्यासाठी हे पुस्तक बराच मालमसाला पुरवणारे ठरेल.

*आत्मवेध, पृष्ठे २००, एकशेवीस रुपये*

## ॥ रसिक वाचकांची आवड ॥

वाचकांसाठी आम्ही एक अभिनव सदर सुरू करीत आहोत. वाचकांनो, आमच्या प्रकाशनाचे आपल्याला आवडलेल्या पुस्तकाबद्दलचे मत, पुस्तक का आवडले? याबद्दल पत्ररूपाने कळवा. या पत्रांनी शक्य होईल त्याप्रमाणे ग्रंथजगतच्या अंकात प्रसिद्धी दिली जाईल. वाचकांनी स्वत:चे नाव, पत्ता, शिक्षण व नोकरीतील हुद्दा इ. माहितीसह आपली मते कळवावीत.

आमचा पत्ता :
**मेहता मराठी ग्रंथजगत,**
१२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.

**शैलेंद्र राठोड**
देगलूर,
जि. नांदेड-१७.

सस्नेह नमस्कार,

मी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या T Book Club चा मेंबर आहे. क्लबच्या निमित्ताने द हॉट झोन हे पुस्तक माझ्याकडे आले. खरंच सदरील पुस्तक वाचतेवेळेस घटना आपल्यासमोर घडत असल्यासारखे वाटते. ही कादंबरी एकदा हातात घेतल्यावर सोडू वाटत नाही. मी ती अधाश्यासारखी दोन दिवसांत वाचून काढली. वारंवार वाचावी अशी आहे.

कळावे.
*शैलेंद्र राठोड*



**'तिळा उघड'चा मंत्र देऊन बहुमोल अनुभवांची गुहा खुले करणारे ललित लेख**

# रंगरेषा

**शांता शेळके**

विख्यात गीतकार आणि ललित लेखिका शांता शेळके यांना स्तंभलेखनाची आवड आहे आणि त्यांच्या स्तंभलेखनाची आजवर अनेक पुस्तके निघाली आहेत. 'रंगरेषा' हे नवे पुस्तक म्हणजे केसरीच्या रविवारी पुरवणीत त्यांनी त्याच नावाने जे सदर चालवले होते, त्यात आलेल्या २९ लेखांचे संकलन आहे. प्रास्ताविकात त्यांनी म्हटले आहे, " दैनंदिन जीवनातील अनेक लहानमोठ्या घटना, वेगवेगळ्या वृत्तिप्रवृत्तींच्या माणसांशी या ना त्या कारणाने होणाऱ्या भेटी आणि संवाद, निसर्गाच्या अनेक भाववृत्ती, नित्याच्या वाचनातून मनावर होणारे संस्कार, या साऱ्यांमधून मला सदर लेखनासाठी विषय सुचतात. जे इतर कोणत्याच साहित्यरूपाने प्रकट होऊ शकत नाही, असे बरेचसे काही व्यक्त करण्यासाठी सदर लेखनासारखे अन्य माध्यम नाही असा माझा अनुभव आहे.

शांताबाईंचे वाचन संस्कृत, प्राकृत, इंग्रजी, उर्दू, मराठी असे सार्वदेशीय आहे; त्यांचे लोकसाहित्यातील अवगाहन अफाट आहे, पाठांतरही विस्मयकारक आहे. पत्रकारिता-लेखन-प्रकाशन-कार्यक्रम या निमित्ताने अमाप मित्रपरिवार आणि चाहत्यांचा वर्ग त्यांना लाभला आहे. नवीन प्रवाहांशी कौतुकाने त्या सलगी करतात परंतु आपल्या मूळ स्मरणरंजनाशी त्यांच्या निष्ठा अविचल आहेत. एकूण भूमिका आस्वादकाची असल्याने आपल्या प्रौढत्वीही त्यांनी आपले शैशव मनोभावे जपले आहे. शांताबाई गोष्टीवेल्हाळ आहेत; गप्पांचा त्यांना कंटाळा कधी येत नाही. त्यामुळे त्यांच्या ललित लेखांमधून त्या आपल्याशी मोकळ्या मनाने गप्पा मारत आहेत असेच जाणवत राहते; आणि त्यांच्या विविध विषयांवरील आत्मीयतेच्या टीकाटिपणीने आपल्या रसिकतेच्या कक्षा अलगदपणे विस्तारत जातात. मग एखादा हायकूही त्यांच्या स्पर्शाने आपल्या लेखी परीसाचे काम करून

आपल्या भावजीवनाला सुवर्णाची झळाळी आणतो. शांताबाईंच्या लेखनाचे जे चहाते आहेत, ते त्यांच्या शब्दांच्या परीसस्पर्शासाठी असे आतुर असतात, ते उगाच नव्हे. नेहमीच्या चिरपरिचित गोष्टींनाही शांताबाई आपल्य व्यक्तिमत्त्वाच्या वलयाने अलीबाबाच्या गुहेतील अमाप खजिन्याची श्रीमंती बहाल करतात.

'रंगरेषा'मधील लेख वाचतानाही या त्यांच्या किमयेची प्रचीती येते. लेखांचे विषय तसे नेहमीचेच आहेत, पण त्याकडे पाहण्याची शांताबाईंची जी दृष्टी ती वेगळी आहे; त्यामुळे खरी मजा येते. वाङ्‌मयीन संदर्भांनी त्यांचे सारे लेखन दुथडी भरून वाहन असते. आत्मचरित्रात्मक व व्यक्तिपरिचयात्मक उल्लेखही सतत येतात. सहजपणे येतात.

विषय नेहमीचे म्हणजे काय? तर या संग्रहातल्या काही लेखांची शीर्षकेच त्याबद्दल सांगतील. पेशवेकालीन पुणे, मैत्रीचे निकष आणि मर्यादा, शब्दांची गंमत-गमतीचे शब्द. नातेसंबंध-जुने आणि नवे, रिमझिम पाऊस पडतो बाई, जुनी फाईल, बातमीचा बळी (डायनाचा मृत्यू), इ. आणि आपल्याच जीवनातील काही आठवणींना उजाळा देणारे प्रसंग व व्यक्तिविशेष टिपणारे लेख उदा. सेन्सॉर बोर्डाचे दिवस, बिऱ्हाडकरू, आजीची ताटली लोटी, लेखक असल्यामुळे, प्रतिबिंब (फोटो काढण्याचे अनुभव), जीवनाविषयी थोडेसे, इ.

लेखनाने पैसा फारसा मिळत नाही. लेखनाने आपल्याला फारसे द्रव्य दिलेले नाही, फारसे निर्मितीचे समाधानही अजून लाभलेले नाही; आपल्या लेखनातील उणिवा व कलात्मक मर्यादा यांची आपल्याला जाण आहे, असे शांताबाई म्हणतात. "मी सर्वसामान्य माणूस आहे आणि कधी कधी थोडीशी लेखक आहे, हीच माझी माझ्यापुरती स्वतःशी असलेली ओळख (आयडेंटिटी) आहे." असेही त्या सांगतात. व्यवसाय म्हणून लेखनाचा मार्ग स्वीकारल्यामुळे आपण 'केवळ कलानिर्मितीसाठी एकाग्र, व्रतस्थ आणि उग्र साधना करणाऱ्या "थोर लेखकांपैकी नाही हेही त्या कबूल करतात. परंतु लेखन ही माझ्या जीवनातली आनंदाची गोष्ट आहे आणि लिहिताना मला जे समाधान लाभते तीच माझ्या लेखनाची फलश्रुती आहे... पानेच्या पाने लिहिणे, डोळे-हात-मान दुखेपर्यंत लिहिणे ही माझी गरजच आहे, केवळ मानसिक नव्हे तर शारीरिकसुद्धा." अशी त्यांची श्रद्धा आहे.

आपल्या लेखनाला दाद देणारे वाचक त्यांना भेटतात; त्याबद्दल त्यांना मोठा आनंद वाटतो. कुणाशी तरी आपला सूर जुळतो याचे समाधान मिळते. वाचक-लेखक जवळीक हा प्रकार उभयपक्षी आनंददायक असतो. कधी कधी त्यामुळे अनेक जण आपल्या आयुष्यातले पेचप्रसंग सांगायलाही त्यांच्याकडे येतात. "तुम्ही माझ्या जीवनावर एक कादंबरी लिहा. नाहीतर झकास नाटकच लिहून टाका. बेफाम होईल बघा..." असाही कोणी पाठपुरावा करतात.

पेशवेकालीन पुण्याचे वर्णन प्रा. चिं. ग. भानू यांच्या शृंगेरीची लक्ष्मी या कादंबरीच्या आधारे त्या करतात, आणि सवाई माधवरावाच्या काळातील पुण्यातील रंगढंग आणि श्रीमंती याकडे लक्ष वेधतात. त्यावेळी सराफ कट्ट्याजवळच्या शाक्ताश्रमात नेमनिष्ठ ब्राह्मण ताडी प्यायला जात असाही प्रसंग त्या कादंबरीत आहेत; आणि लक्ष्मी ही नायिका गाण्याद्वारे अर्थार्जन करीत असली तरी शृंगेरी धर्मपीठाला ती बहुतांश कमाई देते असे दाखवले आहे.

य. गो. जोशी यांच्या 'हेमगर्भाची मात्रा' या कथेची नायिका आसन्नमरण व्यक्तीला हेमगर्भाची मात्रा देऊन बरे करते. ती तशा मृत्युशय्येवर असणाऱ्या व्यक्तींच्या शोधातच राहते. हे शांताबाईंना चमत्कारिक वाटते. तिच्याजवळ अभिमान वाटावा अशी हेमगर्भाची मात्रा हीच एक वस्तू आहे; आणि आपला अहंकार वा प्रतिमा हेमगर्भाच्या मात्रेची मालकीण म्हणूनच तिला मिरवणे शक्य होते. त्यावरून आपल्या इगोसाठी लोक काय काय करतात याबद्दलचे विवेचन शांताबाई करतात. काहीशा खोडकर-खट्याळपणे त्या म्हणतात, "आपला इगो टांगून ठेवण्यासाठी लोक कसल्या ना कसल्या खुंट्या बनवतात. जन्मभर जपत राहतात." तर काही माणसे अहंकार दुखावला गेल्यामुळे जन्मभर कडवटपणे प्रत्येक गोष्टीवर टीकेचा भडिमार करीत राहतात. इतरांची टवाळी करीत राहतात; कुत्सित बोलत राहतात. आपले जिवलग मित्रही काही वेळा मानसिक आधार देण्याऐवजी मत्सराच्या पोटी भांडणे, चिडचिडेपणा, आक्रस्ताळेपणा यांच्या आहारी जातात. शांताबाई त्यावर भाष्य करतात, "जगामध्ये सारेच काही सुंदर, ॠजू, विलोभनीय नसते. इथे हेवेदावे आहेत, असूया आहे. मत्सर आहे. कुजकेपणा आहे. जे दुसऱ्याला मिळाले ते मला मिळाले नाही, कदाचित माझी लायकी त्याच्यापेक्षा जास्त असूनही मिळाले नाही या जाणिवेमुळे मनातून उमटणारे असंतोषाचे फणकारे आहेत. सारे काही आहे आणि मुख्य म्हणजे आपणांपैकी कुणीही साऱ्या मनोविकारांवर प्रभुत्व मिळवून स्थितप्रज्ञतेच्या पदवीला पोचलेला नाही. पण म्हणून तर मैत्रीचे महत्त्व, प्रेमाचे महत्व. त्याचा बळी देऊन मिळवावे इतके मोलाचे आणि आनंददायक असे दुसरे काही नाही. अगदी आपले आत्मप्रेमसुद्धा."

-असा आपुलकीचा सल्लाही या लेखांमध्ये सहजपणे मिळत राहतो. म्हणून हा लेखसंग्रह सतत जवळ ठेवायला हवा. शांताबाईंचे मित्रपण त्यांच्या प्रत्येक लेखांतून आपल्याला साद घालत राहते.

***रंगरेषा, पृष्ठे १२३, पंचाहत्तर रुपये***

**T बुक क्लब**चे आजच सभासद व्हा व उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा. **सभासद फी - फक्त २०रु.** या वर्षीच्या क्लबमधील दोन पुस्तके उपलब्ध!
*संपर्क :* **मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

**आपला अनुभव, ज्ञान व कर्तृत्व यांना वाव देणाऱ्या अर्थार्जनाच्या अनेक संधी उपलब्ध**

# निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय

**गंगाधर महांबरे**

नोकरी कुठलीही असली तरी साठीनंतर निवृत्ती अटळच! सध्या एकूणच आरोग्यमान सुधारलेले असल्याने पंचाहत्तरीतही व्यक्ती शारीरिक व बौद्धिक दृष्ट्या कार्यक्षम असल्याचे आढळून येते. साहजिकच वय वर्षे साठ झाल्यामुळे जरी नोकरीतून मुक्तता झाली तरी पुढची अनेक वर्षे आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची क्षमता आणि कुशलता त्या व्यक्तीकडे असते. परंतु दुर्दैवाने तिचा वापर करण्यासाठी लागणारी यंत्रणा आपल्याकडे नाही. निवृत्ती ही नोकरीपुरती असते; ती काही जीवनापासून निवृत्ती नसते. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपण कार्यरत राहणे, आपल्या आवडीचे काम करीत राहणे, आपला वेळ आणि शक्ती उपयुक्त कामात गुंतवणे – ही आजची जागतिक मनोभूमिका आहे. आणि ज्येष्ठ नागरिकांना निवृत्त म्हणजे निरुपयोगी अडगळीतली वस्तू किंवा रिकामटेकडा भार न समजता, समाजाचे उपयुक्त, समंजस, उत्पादक घटक म्हणून सन्मानाने जगण्याची संधी असायला हवी असा आग्रह धरला जात आहे. त्या दृष्टीने निवृत्तीनंतर त्यांना अंशकालीन नोकरी वा द्वितीय जीवनक्रम (सेकंड करीयर) पुरवठ्याची निकड जाणकारांच्या लक्षात येत आहे. ज्यांना निवृत्ति वेतन आहे अशा व्यक्तींना आपला निर्वाह स्वावलंबीपणे करता येतो; परंतु ज्यांना निवृत्ति वेतन मिळत नाही आणि उत्पन्नाचे विशिष्ट साधन नसते अशा ज्येष्ठ नागरिकांनाही अर्थाजनाची आवश्यकता असते; आणि तशी संधी समाजात उपलब्ध हवी अशी विचारसरणी आता मूळ धरीत आहे.

गंगाधर महांबरे यांनी उद्योगव्यवसायविषयक मार्गदर्शनपर बरीच पुस्तके लिहिली आहेत. 'निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय' हे त्यांचे नवे पुस्तकही अनेक नवनव्या कल्पनांचा पाठपुरावा करणारे आहे.



फारशी आर्थिक गुंतवणूक न करता स्वत:च्या पूर्वानुभवाच्या क्षेत्राला प्राधान्य देऊन काही व्यवसाय करता येतील.

उदाहरणार्थ, वैद्यकीय प्रतिनिधी, मालिश करण्याचा व्यवसाय, साहित्याचे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर, परभाषकांसाठी मराठी भाषा शिकवण्याचे वर्ग, वृत्तपत्रांतून विविध विषयांवर लेखन करणे, पुस्तकांचे व स्मरणिकांचे संपादन करणे, प्रूफ करेक्शन करणे, नियतकालिकांचा बातमीदार म्हणून काम करणे, दोन भिन्नभाषिक व्यक्तींमध्ये दुभाषी व्यक्ती – इंटर प्रिटर म्हणून काम करणे, सहलीसाठी वाटाड्या मार्गदर्शक म्हणून काम करणे, कमिशन बेसिसवर पुस्तके वगैरे माल विकणे, मंडप-लाउडस्पीकर वगैरे सेवा पुरवणे, वृत्तपत्र व नियतकालिक विक्रीकेंद्र चालवणे, असे काही व्यवसाय अत्यल्प व अल्प भांडवलात सुरू करता येतील.

सध्या पुरोहितांची वानवा आहे. तेव्हा टेपरेकॉर्डरवर कॅसेट लावूनही अनेकदा सत्यनारायणाची पूजा व इतर धार्मिक विधी केले जातात. जरा पुरोहिताचे प्रशिक्षण घेतले तर आज चांगली कमाई होऊ शकते.

या शिवायही महांबरे यांनी अनेक उद्योग सुचवले आहेत.

- शेअर खरेदी विक्री, इन्कमटॅक्स व इतर कर याबाबत सल्ला देणे.
- टॅक्सी, बस, सुमो इ. वाहने भाड्याने देणे; मिळवून देणे
- कॅसेट लायब्ररी चालवणे, पुस्तकांचे वाचनालय चालवणे,
- फॅक्स, झेरॉक्स, फोन बूथ चालवणे.
- विविध कर भरण्याचे काम करणे, त्यासाठी विशिष्ट शुल्क घेणे.
- संस्कार केंद्र, संगीत-वादन-नृत्य-पाकशास्त्र-हस्तकला वर्ग घेणे.
- व्हीसीआर, जनरेटर, भांडीकुंडी, वगैरे भाड्याने देणे.
- कुरियर सेवा-पत्र कलेक्शन सेंटर चालवणे.
- टाइपसेटिंग – डीटीपी युनिट चालवणे. ग्राफिक्स सेवा देणे.
- भेटवस्तूंचा पुरवठा करणे.
- कलात्मक शुभेच्छा पत्रे तयार करणे, विकणे.
- घरोघर जाऊन मासिके, पुस्तके देणे. फिरते वाचनालय चालवणे.
- पार्टीच्या वेळी करमणुकीचे कार्यक्रम, नकला वगैरेंचे कार्यक्रम करणे.
- झाडांच्या कुंड्यांची 'लायब्ररी' चालवणे.
- विविध ऑफिसेसना दरमहा वेगवेगळ्या कुंड्या पुरवणे.
- पाळणाघरे चालवणे.

या अशा व्यवसायांमध्ये स्वत:ची गुंतवणूक करण्याची क्षमता यापेक्षाही त्या क्षेत्रातील अनुभव व आवड यालाच जास्त मोल असते. उदाहरणार्थ, प्रूफरीडिंग घ्या. जर

आपले शुद्धलेखन चांगले असेल तर तो बिनभांडवली धंदा ठरतो. सध्या एका फॉर्मला ५/६ रुपये मिळतात. दिवसात चार पाच फॉर्म सहज वाचून होतात.

नाट्यक्षेत्रातील व्यक्तीला नकला व लहान नाट्य प्रवेश यासाठी एकेका संध्याकाळी हजार पाचशे रुपयेही मिळू शकतात. संस्कार केंद्रात संस्कृत वा अन्य पाठांतर करून घेण्यासाठी आपले पाठांतर उपयुक्त ठरते. गुंतवणूक अन्य काही नाही. फार तर काही पुस्तके घ्यावी लागतील.

या पुस्तकात प्रथम प्रत्येक व्यक्तीने स्वत:चे वास्तव मूल्यमापन करण्यासाठी काही तक्ते दिले आहेत. उदा. वेळेचे आत्मशोधन या तक्त्यात आपण कसा वेळ घालवतो या हिशेब मांडायला आहे. कुटुंबिय मंडळींचा सहवास, इतर भेटीगाठी, गृहसजावट, बागबगीचात काम, खेळ, समाजात मिसळण्याचे प्रसंग, नवीन कला व छंद शिकणे, प्रवास, विश्रांती, नातवांची शाळेतून ने आण, ग्रंथालय भेट व वाचन, पूजाअर्चा - ध्यानधारणा, सभा संमेलनांना हजेरी, दूरदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम इ. बाबींवर आपला किती वेळ जातो आणि धंदाव्यवसायासाठी दिवसात आपण किती वेळ काढू शकतो हे प्रथम ठरवता येईल. अनेकदा कामाची इच्छा असते पण आपल्याला वेळच नसतो.

नवीन उद्योग स्वीकारताना, दर्जा, अर्थप्राप्ती, आव्हान, जबाबदारी, ताण, सुरक्षितता, स्वत:च बॉस असणे, कामाचे वेगळेपण, सहकाऱ्यांबरोबर संबंध, नवे केल्याचा आनंद या बाबींपैकी कुठल्या बाबीला आपण प्राधान्य देतो याचाही स्वत:शीच अंदाज घेणे इष्ट ठरते.

उद्योजकाच्या अंगी अनेक गुण हवे असतात. दूरदृष्टी, ज्ञान, तंत्रज्ञान, संघटना कौशल्य, उपक्रमशीलता, स्वतंत्र बुद्धी, धोका पत्करण्याची तयारी, भविष्याबद्दल विश्वास, स्वकर्तृत्वाची जाण, स्वत:च्या गुणांची कल्पना म्हणजे स्वप्रतिमा, जबाबदारी पत्करण्याची कुवत व इच्छा, हिशेबीपणा, आर्थिक दृष्टिकोन, प्रचंड उत्साह, नेमके काय करायचे आहे याचे भान, आपल्या उत्पादनाची दर्जा व वेगळेपणा याबद्दलचा कटाक्ष, बाजारातील चढउताराचा व वातावरणाचा नेमका अंदाज घेण्याची क्षमता इ. अनेक गुणांची उद्योजकाला मदत होते. एखादी चूकही त्याला हजारो लाखो रुपयांचा फटका देऊ शकते; तर एखादी नवी कल्पना यशस्वीपणे राबवली तर लाखोंची कमाईही होऊ शकते.

साड्यांची विक्री, सहकारी उद्योगव्यवसाय, शेतीवर आधारित उद्योग, (अन्नपदार्थ तयार करणे, तंबाखूपासून उत्पादने, सरबते, कापूस विणून होणारी उत्पादने, लोकर-रेशीम-कृत्रिम तंतू यांपासून बनणारे कपडे, ताग-अंबाडी-घायपात उत्पादने, कापडापासून उत्पादने, लाकडी सामान, कागद व कागदी उत्पादने, कातड्यांच्या वस्तू, लोकरी उत्पादने, धान्य व फळांवर प्रक्रिया, फलोत्पादन व त्यावर आधारित उद्योग, केमिकल उद्योग, याबद्दलही बरीच माहिती गंगाधर महांबरे यांनी दिली आहे.

१९९९ हे वर्ष युनेस्कोने ज्येष्ठ नागरिकांचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले आहे.



लोकसंख्येत ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण दरसाल वाढत आहे. त्यांचे कौशल्य, अनुभव व कर्तृत्व यांचा वापर उत्पादक अशा कामासाठी व्हावा, समाजाला त्यांचा उपयोग व्हावा ही गरज त्यामुळे अधिकाधिक तीव्र होत जाणार आहे. ज्येष्ठांना स्वस्थ घरी बसवून आळसात वेळ घालवणे भाग पडू नये म्हणून नवनवीन उद्योगाच्या संधी शोधणे क्रमप्राप्त आहे. त्या दृष्टीने आवश्यक ती मनोभूमिका तयार करण्यासाठी हे पुस्तक मोलाचे ठरेल.

***निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय, पृष्ठे ७५, चाळीस रुपये***

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| टे | र | क | डे | खां | सु | के |
| मा | शे | ळ | के | र्वे | र | ड |
| शि | र | वा | ड | क | र | फ |
| ग | शी | क | ळ | गी | ड | गा |
| जो | र्णि | गू | ण्डे | क | त्रे | अ |
| क | ड | | र | दा | र | स |
| मा | र | दा | स | रा | मि | |

## साहित्यिकांची नावे सांगा. बक्षीस मिळवा!

शेजारील चौकोनात सोळा नावे आहेत.
हे सर्वच साहित्यिक मराठी
साहित्यसृष्टीतील सर्वोच्च सन्मानाचे
मानकरी ठरले आहेत.
तो सन्मान ओळखा आणि लेखकांच्या
नावासहीत लिहून पाठवा.

रचनाकार : मनोहर बांदेकर

## जोड्या जुळवा, बक्षीस मिळवा!

खाली १० लेखकांची नावे व आडनावे दिली आहेत. त्याच्या योग्य जोड्या जुळवा.

*माधव, सुधीर, सुरेश, महादेव, अंजनी, आशा, निलू, वसंत, रवींद्र, विजय*

*शोभणे, गायकवाड, गव्हाणकर, कर्वे, हसमनीस, पोरे, मोरे, नरवणे, कर्दळे, नाईक*

वरील दोन्ही स्पर्धांची बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १००रु. ची पुस्तके बक्षीस मिळतील.

**पाठवण्याची अंतिम तारीख २० एप्रिल, १९९९.**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.

**पत्नी असले तरी केवळ तुझी**
**बायको एवढंच माझं अस्तित्व नाही**
**एक व्यक्ती म्हणून मला जगायचे आहे**

# नको स्वातंत्र्य स्त्रीला?

**प्रा. दिलीप परदेशी**

**प्रा.** दिलीप परदेशी यांचे 'नको स्वातंत्र्य स्त्रीला'? हे एकविसावे नाटक. १९९४ मध्ये त्याचा पहिला प्रयोग झाला. १९८७ ते १९९८ या अकरा वर्षांच्या काळात त्यांच्या हातून हे एकच नाटक लिहिले गेले. स्वप्न एका वाल्याचे, काळोख देत हुंकार, थेंब थेंब आभाळ या तीन नाटकांना राज्य पुरस्कार मिळाले. सत्यं शिवं सुंदरम्, म्हराज म्येले, मातृवेणा, तळहातीच्या नाजुक रेषा, अस्त, काळी बेबी, मन धुवांधार, नाटक, कहाणी, म्हणून मी तुला कुठं नेत नाही, प्रेमी चतुर-प्रिया फितुर, अबोली वगैरे त्यांची इतर नाटके. त्याशिवाय फिनिक्स, महाद्वार, मन पिंजऱ्याचे, काजळपूर्वा, मोनॅड हे त्यांचे एकांकिकांचे संग्रहही निघालेले आहेत. दोन काव्यसंग्रह आहेत. सांगलीच्या वास्तव्यात भरपूर लेखन करणारे दिलीप परदेशी १९९३ पासून पुण्यात वस्तीला आले आहेत; परंतु पुण्यात त्यांचे लेखन बहुतांशी मंदावलेले दिसते. त्यांना नवा बहर यावा म्हणून मेहता पब्लिशिंग हाऊसने 'नको स्वातंत्र्य स्त्रीला' या प्रमाणेच 'प्रेमी चतुर-प्रिया फितुर', 'म्हणून मी तुला कुठं नेत नाही' ही नाटकं नुकतीच प्रसिद्ध केली आहेत. ती पूर्वीच लिहिलेली व रंगमंचावर सादर झालेली आहेत.

'नको स्वातंत्र्य स्त्रीला'? या नाटकाच्या शीर्षकावरूनच विषयाची थोडी कल्पना येईल. आजच्या बदलत्या काळात पिता, पती, पुत्र या भूमिकेतील पुरुष आपले कर्तव्य व नैतिक उत्तरदायित्व विसरला आणि या तिन्ही रूपांतील पुरुषाच्या आधाराला जर स्त्री वंचित झाली तर तिच्या जीवनाला कोणते स्वरूप लाभेल याबद्दलचा एक दृष्टिकोन या नाटकात मांडण्यात आला आहे. स्त्रीला वाऱ्यावर सोडू नये, पिता-पती-पुत्र या रूपात पुरुषाने तिचा सांभाळ व सन्मान करावा ही मनूची कल्पना आज थोडीफार कालबाह्य ठरू पाहत आहे.



त्यामुळे कुटुंबव्यवस्थेलाही तडा जाण्याचा धोका आहे. घराचे घरपण नष्ट होण्याचा संभव आहे. यात स्त्रीची किंवा पुरुषाची एकतर्फी कैफियत मांडणे किंवा एकांगी कैवार घेणे या साचेबंद सापळयात न सापडता या स्त्रीपुरुष नात्याची वेगवेगळी रूपे दाखवण्याचा प्रयत्न दिलीप परदेशी यांनी या नाट्यकृतीत केलेला आहे. सांगलीच्या अबकड कल्चरल ग्रुपने हे नाटक राज्य महोत्सवात सादर केले. परंतु तीन तासांपेक्षा प्रयोग जास्त लांबल्याने ते स्पर्धेतून रद्दबातल ठरले. व्यावसायिक रंगभूमीवर ते येण्याचे प्रयत्नही फलद्रुप झाले नाहीत. म्हणून ह्या पुस्तकात प्रयोग आटोपशीर होण्यासाठी काही मजकूर चौकटीत घालून तो जरूर तर गाळता यावा - अशी व्यवस्थाही केलेली आहे. पहिल्या अंकात चार प्रवेश आणि दुसऱ्या अंकात सहा प्रवेश अशा दहा प्रवेशात या नाटकाचे कथानक बसवण्यात आले आहे.

कॉलेजात शिकणाऱ्या 'मराठा' लीलीचे प्रेम मॅथ्सचा लेक्चरर मायकेल याच्यावर बसते; तिचे फौजदार वडील त्यामुळे खवळतात. आईवेगळया लीलीवर तिची आत्या खूप माया करते. पण तिचेही लीलीच्या वडिलांपुढे काही चालत नाही. "लग्न केलेत तर हे घर कायमचे बंद' असे वडील बजावतात. लीलीला निघताना रुक्मिणी आत्या सांगते, "लग्न झाल्यावर पैठणी नेसून कुलस्वामिनी आई अंबाबाईच्या दर्शनाला जोडीनं जा." पण मायकेल तिला दगा देतो; आणि "आपलं लग्न होणं शक्य नाही" अशी चिठ्ठी पाठवतो; त्यामुळे लीलीला परत घरी यावे लागते. वडील संतापून तिला मारू पाहतात; तर त्यांच्या घरी आलेला तरुण वकील नारायण तिच्याशी लग्नाची तयारी दाखवतो.

पहिल्याच रात्री नारायण तिच्या व मायकेलच्या प्रीतीचे प्रकरण उकरून काढून तिचा उपमर्द करतो, आणि "तिच्या मनातली त्या ख्रिश्चन प्रेमिकाची आठवण पूर्णपणे मेली पाहिजे - मला माझ्या पद्धतीने जाऊ दे - मला जन्मभर संसार करायचाय, तुम्हाला नाही" असे तिच्या वडिलांना सुनावतो. त्यानंतर अल्पावधीतच वडिलांचे देहावसान होते. आणि इकडे लीलीला दिवस जातात. " ज्याची मला घृणा वाटते अशा माणसाचा अंश मी वाढवणार नाही" असे म्हणून तिची गर्भपाताची मनोमन तयारी करते. पण आत्या तिला अडवते. त्याचवेळी तिला मायकेल भेटून सांगतो की लीलीच्या वडिलांनी एका पोलिस इन्स्पेक्टरच्या मदतीने त्याला मारहाण करून त्याजकडून ती चिठ्ठी जबरदस्तीने लिहून घेतली होती; आणि खोट्या आरोपावरून त्याला पोलिस कस्टडीत डांबून ठेवले होते. नारायणला सोडून लीलीची त्याच्याबरोबर जाण्याची त्यावेळीही तयारी असते; पण तेवढ्यात नारायणला पक्षाघाताचा झटका येतो आणि लीलीचे सगळे जीवनच जणू गोठून जाते. ती शिक्षिकेची नोकरी करून घर चालवते. मुलगा राजीव याला वाढवते. राजीव मोठा होतो. तोही नोकरीला लागतो. कंपनीचा फ्लॅट, गाडी, पंधरा हजार रुपये पगार.

आई राजीवला आशीर्वाद देते, "चांगला पुरुष हो, चांगला पुत्र - चांगला पती आणि चांगला पिता." राजीवचे नीना राठोडशी लग्न होते. ती मूळ राजपूत पण महाराष्ट्रातच

जन्मलेली वाढलेली. लीली तिचे नाव वसुंधरा ठेवते. ही वसुंधरा नवऱ्याला बजावते, "एक लक्षात ठेव केवळ तुझी बायको एवढंच माझं अस्तित्व नाही. मला सेल्फ आयडेंटिटी जपायची आहे. स्त्री असले तरी एक व्यक्ती म्हणून जगायचं आहे."

लीली आणि वसुंधराचे कधीमधी खटके उडतात. ती वेगळी राहू लागते. एकीकडे आई-दुसरीकडे पत्नी अशा कैचीत राजीव सापडतो. तशात वसुंधरेला दिवस जातात. अमेरिकेला जायला राजीव विमानाने निघतो. पण ते विमान काहीतरी बिघाड होऊन कोसळते. राजीवही त्यात मृत्युमुखी पडतो. तेव्हा वसुंधरा गरोदर असते. गर्भपाताचा विचार करते. त्यावेळचा त्या दोघांमधील हा संवाद बोलका आहे.

***लीली*** *- वसुंधरे, पृथ्वीनं नाही नाकारलं कधी मातृत्वाला.*

*मनुष्यप्राण्यात फक्त दोनच मूलभूत प्रवृत्ती आहेत.*

*एक जगण्याची आणि दुसरी वंशवाढीची.*

***वसुंधरा*** *- वंशवाढ नंतर. आधी जगणं महत्त्वाचं. मला सुखानं जगायचंय.*

***लीली*** *- स्त्री ही मुक्तीच्या नावाखाली मातृत्वाला नकार देऊ शकत नाही. असं झालं तर पृथ्वीची गती थांबेल. आयुष्याचा अर्थ गमावेल. - आणि मी तुझ्या जगण्याला अर्थ देऊ पहातेय.*

***वसुंधरा*** *- राजीव असता तर या मातृत्वाला अर्थ होता. किती स्वप्नं रंगवली होती आम्ही होणाऱ्या बाळाची! पण आता राजीवच राहिला नाही. तर-*

***लीली*** *- निदान माझ्या राजीवचा अंश राहू दे. त्याचा वंश राहू दे. नको करू नष्टांश... माझी श्रद्धा आहे की माझा राजीवच तुझ्या पोटी पुनर्जन्म घेणार आहे!*

***वसुंधरा*** *- म्हणजे माझा राजीवच माझ्या पोटी? नाही हे सत्य नाही.*

***लीली*** *- हे सत्य आणि हेच सत्य आहे असं माझं मन सांगतंय.*

***वसुंधरा*** *- हे सत्य असेल किंवा नसेल. पुनर्जन्म असेल किंवा नसेल. पण एक निश्चित की मी या बाळाला जन्म देणार आहे. तुमच्यासाठी.. बाळ तुमच्या पदरात घालून - मी अमेरिकेला निघून जाईन - माझ्या भावाकडं... कबूल?*

***लीली*** *- तू जाते म्हणालीस तरी मी जा म्हणणार नाही. थांबते म्हणालीस तरीही मी जा म्हणणार नाही.*

लीली ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा. ती आपल्या वडिलांच्या विरोधात जाऊनही मायकेलशी लग्न करण्यासाठी घर सोडायला तयार होते. मायकेलची नकाराची चिठ्ठी आल्यावर नारायणशी लग्नाला उभी राहते; नारायण आपला पुरुषीपणा दाखवू पाहतो तेव्हा ती आपले बंड़खोर व्यक्तित्व प्रकट करू पाहते. पण त्याआधीच नारायणला पक्षाघाताने असहाय करून नाटककार लीलीचाही पुढचा आयुष्यक्रम एका चाकोरीत बद्ध करतो. तिचा मुलगा राजीव हा स्वत:च आपल्या आवडीच्या मुलीशी लग्न करून घरी येतो. आपल्या राजपूत सुनेचा लीली स्वीकार करते. पण नाटककार राजीवचाही अनपेक्षित मृत्यू दाखवतो. अपत्यजन्माच्या वेळी वसुंधरा किंवा तिचे बाळ-राजीवचा अंश यातून निवड करायचा पर्याय डॉक्टर सुचवतात, तेव्हा लीली वंशसातत्याच्या बाजूने कौल देते. पण बाळ-बाळंतीण दोघेही सुखी आहेत म्हटल्यावर ह्या नैतिक पेचातून आपोआपच तिची सुटका होते आणि सुनेलाही उपरती होते. अमेरिकेत भावाकडे कायमचे जाण्याचा विचार वसुंधरा रद्द करून राजीवच्या मुलाला सांभाळत येथेच राहण्याचा निर्णय घेते.

स्त्रीला स्वातंत्र्य असते की नसते? अपत्याला सांभाळण्याची जबाबदारी अंगावर आली की ती स्वत:चे वेगळे अस्तित्व विसरते; आणि मुलाचे संगोपन करते; वंशाचा दिवा वाढवताना घरदार-कुटुंब चालवते. पुरुषाचे संरक्षक कवच असले नसले तरी ती जगत राहते; आपले कर्तव्य पाळत राहते.

प्रा. दिलीप परदेशी जी कल्पना प्रारंभी प्रेरणा-सूत्र म्हणून देतात, तिचा एका विशिष्ट दिशेने होणारा प्रवास तेवढा या नाटकात दाखवतात. नाट्यपूर्ण प्रसंग, खटकेबाज संवाद यावर त्यांचा भर आहे. नारायणचा पक्षाघात, राजीवचा विमान अपघातात मृत्यू वगैरे योगायोगांमुळे कथानकाची एकूण वास्तू व्यवस्थित चिरेबंदी होत नाही; नाट्यात्मकता संघर्षातून प्रकट होते. येथे संघर्ष होतच नाही. अपघातामुळे प्राप्त परिस्थितीचा स्वीकार करणे अटळ ठरते. नेमके काय साधायचे आहे, त्यासाठी व्यक्तिरेखेची उभारणीही तशीच जबरदस्त टोकदार व्हायला हवी - स्त्रीस्वातंत्र्याचा संदेश मागे पडतो. तरीही प्रयोगदृष्ट्या नाटक गतिमान वाटेल असे वाटते.

***नको स्वातंत्र्य स्त्रीला? पृष्ठे ८०, पन्नास रुपये***

## जानेवारी ९९ स्पर्धा निकाल

### मुखपृष्ठे ओळखा, बक्षीस मिळवा!

१) युगंधर २) शेलका साज ३) भारत विकणे आहे
४) कांचनकण ५) पाणी कुठंवर आलं गं बाई ६) सातव्या मुलीची सातवी मुलगी

**विजेते स्पर्धक :**

१) **मधुकर जोशी,** महाराष्ट्र मंडळ, कचहरी रोड, अजमेर (राजस्थान), अजमेर

२) **सारिका सोनार,** ता. कोरेगाव, जि. सातारा, मु.पो. रहिमतपूर.

३) **व्यं. मा. कल्याणपाड,** मु.पो. अंबुलगा बु., ता. मुखेड, जि. नांदेड-४३१७१५.

***सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन!*** त्यांनी आपल्या पसंतीची रु.१००ची पुस्तके कळवावीत.

**देवांच्या दास्यातून मुक्त झाली, तरच आपण खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ**

# सुशीलेचा देव

**संपादक : वि. स. खांडेकर**

सत्तर वर्षांपूर्वी म्हणजे १९२९मध्ये म्हणजे प्रसिद्ध झालेल्या 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील सुशीला आणि बळवंतराव बोटीने परदेशी जायला निघतात. तेव्हा देव नाकारणाऱ्या सुशीलेला लेखक म्हणतो, ''बाकी देव नको म्हणालात तरी तुमच्या पोटी एक देव, (नाहीतर देवी) सहासात महिन्यांनी येणार आहे असे मला एका गुप्तहेराने सांगितले आहे. वाईट एवढंच वाटतं की हा बाल-देव हिंदुस्थानाबाहेर जन्माला येणार आहे.'' त्यावर सुशीलेचे यजमान बळवंतराव म्हणतात, ''तो बालदेव सबंध जग आपलं घर मानील. तो कृत्रिम देशमर्यादा मानणार नाही. तो आंतरराष्ट्रीय होणार आहे.''

आज सत्तर वर्षांनी अशा 'आंतरराष्ट्रीय' नागरिकत्व मिरवणाऱ्या भारतीयांची संख्या काही कमी नाही; परंतु सुशीलेला अभिप्रेत असणाऱ्या देवधर्मविरहित मनुष्यधर्माची कास त्यांनी धरलेली आहे असे मात्र दिसत नाही. आर्थिक विषमता संपुष्टात येऊन 'समाज आणि व्यक्ती यातील द्वैत नष्ट झाल्यामुळे मालक आणि नोकर, माझं काम आणि तुझं काम हा भेदच राहणार नाही. सगळी कामं आपली, जे काही होतं ते आपलं असं प्रत्येकाला वाटू लागेल, आणि जो तो जे येईल ते काम आपलं असं समजून उत्तम रीतीनं, सुंदर रीतीनं, आनंदानं आणि हौशीनं करील, तेव्हा समाजातले विरोध, मांडणं, संप, मारामाऱ्या, युद्ध-महायुद्धंही संपतील.'' हा तिचा आशावाद आजही केवळ स्वप्नातल्या कल्पनेतच आहे; आणि ''आम्ही देवांच्या दास्यातून मुक्त झालो, आम्ही आता स्वतंत्र झालो, आणि लोकांनाही आम्ही आता स्वतंत्र करणार'' हा त्यांचा निर्धार आज सत्तर वर्षांनीही केवळ कागदावरच राहिलेला आहे.

हे सर्व खरे असले तरी सत्तर वर्षांपूर्वीच्या पुण्याच्या सनातनी ब्राह्मण समाजात देवाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी, देव नाकारून, देवांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन



माणूसपण हेच सर्वश्रेष्ठ असा आग्रह धरणारी सुशीला ही नायिका आजही बंडखोर आणि आदर्श वाटावी अशीच आहे. अशा पाखंडी विचारांबद्दल त्यावेळचे ब्रिटिश सरकार तिला व तिचे द्वितीय पती बळवंतराव यांना पकडते; परंतु ब्रिटिश सरकारलाही त्या विचारात राजद्रोहाचा खटला भरण्यासारखे काही शोधून दाखवता येत नाही आणि सोडून द्यावे लागते. आजच्या ठोकशाहीच्या काळातही कदाचित हे आश्चर्य ठरावे. सांगायचे तात्पर्य हे की वामन मल्हार जोशी यांनी १९२९साली 'सुशीलेचा देव' ही कादंबरी लिहून मराठी माणसाच्या भावविश्वात किती प्रचंड गोंधळ उडवून दिला असेल - याची आज कल्पनाही करवत नाही.

सुशीलेच्या रूपाने स्वतंत्र विचार करणारी, रूढी परंपरा-देवधर्म-कर्मकांड आणि बाबा वाक्यं प्रमाणम् या प्रवृत्तीला आव्हान देणारी तेजस्वी नायिका वामन मल्हारांनी उभी केली; आणि आजच्या बंडखोर स्त्रीलाही सुशीलेइतकी बंडखोरीची पातळी गाठणे जड जाते - इतकी तिची वैचारिक प्रगल्भता त्यावेळीही त्यांनी दाखवली - याचे अप्रूप उरतेच. म्हणूनच 'सुशीलेचा देव' ही कादंबरी आजही तितकीच वाचनीय आणि ताजी तरतरीत वाटेल - ती वाचायला हवी असे आग्रहाने सांगावेसे वाटते.

वि. स. खांडेकर यांनी 'सुशीलेचा देव'ची संक्षिप्त आवृत्ती ११२ पृष्ठात सिद्ध केली; आणि तिला प्रस्तावनाही लिहिली. १९५३ साली म्हणजे या कादंबरीच्या लेखनाला पंचवीस वर्षे होत आल्यावर! चांगले साहित्य कधी शिळे होत नाही. काळाच्या कसोटीवर ते घासून पुसून घेतले गेल्याने अधिकाधिक उजळत जाते. ही कादंबरी-लेखन आहे.

''सुशीला ही खऱ्या अर्थाने नवी स्त्री आहे. मध्यमवर्गातल्या स्त्रीच्या वेषभूषेत आणि बाह्य जीवनातच क्रांती झालेली नाही, ती तिच्या अंतरंगातही होत आहे, तिचे विचार व भावना, श्रद्धा आणि ध्येये तळापासून ढवळून निघत आहेत, हे जितक्या सहजपणे, सूक्ष्मतेने आणि ठाशीवपणाने या कालखंडात कुठे प्रतिबिंबित झाले असेल तर ते या कादंबरीतच!'' असे खांडेकरांनी म्हटले आहे. ते अगदी यथार्थ आहे. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री किंवा शारदा 'आम्ही गाइ गरिब जातीच्या! नाहि आम्हां वाचा' असे म्हणणारी होती. १९१५मध्ये वामनरावांनी 'रागिणी' लिहून भांडखोर म्हणता येईल अशी उत्तरा ही उपनायिका चितारली. पण ती केवळ शाब्दिक बंडखोरी करणारी होती. **सुशीलेच्या रूपाने पहिली विचारप्रधान नायिका मराठी ललितवाङ्मयात अवतरली.** तिचा पती रावबा दुसऱ्या बाईच्या नादी लागतो, समाजात मोकळेपणाने वावरताना तिला जगाच्या संशयी जिभेशी मुकाबला करावा लागतो; अशावेळी ती त्या संकटाला तोंड देतानाच आपले दुःख हे समाजाच्या अशाच प्रकारच्या दुःखाचा एक लहानसा भाग आहे हे लक्षात घेऊन अंतर्मुख होऊन व्यापक विचार करू लागते आणि आपल्या सामाजिक दुःखांच्या मुळाशी असलेली कारणे शोधून काढते; हे तिचे वैशिष्ट्य आहे. ''जगात देव आहे का?'' असा प्रश्न विचारून, त्याच्या अस्तित्वाचा शहानिशा करणारी सुशीला ही त्यावेळच्या सनातनी व सुशिक्षित

वर्गालाही भलतीच स्टंट वाटली असणार! त्या वेळच्या जागरूक स्त्रीची प्रतिनिधी म्हणूनही सुशीला अनेकांना परवडली नसती, इतकी ती वैचारिक दृष्ट्या प्रगत आहे.

जळी स्थळी काष्ठी पाषाणी देव आहे हा प्रारंभीचा संस्कार. लग्नानंतर पती हाच परमेश्वर  या कल्पनेला तडा जातो. पती म्हणजे मातीच हे कळून येते.

परंतु हा सज्जनांचा वाली असलेला सर्वशक्तिमान परमेश्वर समाजतल्या सत्प्रवृत्त व सच्छील माणसांच्या सहाय्याला धावून येत नाही हे तिला जाणवते.

परलोकाची व परमेश्वराची भीती आणि नीती यांची सांगड घातली गेली असली तरी वस्तुस्थिती तशी नाही; त्या देवाच्या हाती कौटुंबिक, सामाजिक कल्याणाचा भार सोपवून काहीही पदरी पडत नाही; हे तिला जाणवते.

सुशीलेच्या मानसिक विकासाच्या अनेक पायऱ्या वामन मल्हारांनी दाखवल्या आहेत, आणि शेवटी ध्येय हाच देव या अनुभूतीच्या पायरीवर तिला आणून उभे केले आहे. ‘कधी कधी भूमितीतल्या एखाद्या सिद्धान्ताप्रमाणे, आपला युक्तिवाद सुशीलेच्या रूपाने वामनरावांनी मांडला आहे असेही वाटते. सुशीलेच्या जीवनात सुनंद, बळवंतराव, रावबा आणि काफ हे तरुण येतात. रावबाचा पश्चाताप, सुनंदाचे कौटुंबिक जीवन, काफची आत्महत्या हे प्रसंग चटका लावणारे आहेत. पण ही पात्रे एकांगी वाटतात. कारण वामनरावांनी त्यांचा उपयोग सुशीलेच्या मानसिक विकासातील एकेक टप्पा म्हणून करून घेतलेला आहे. तेवढेच स्थान त्यांना दिले आहे.

सुशीलेच्या देवविषयक कल्पनांमधील बदल जसे घडत गेले तसे ते समाजमनात घडत गेले का? सुशीलेला अभिप्रेत असणारा मानवधर्म अमलात आला का? असे प्रश्न विचारण्यात अर्थ नाही. चार्वाकाच्या काळापासून देवाचे अस्तित्व नाकारणारे विचारवंत समाजात होत आले आहेत; परंतु बहुसंख्या व्यक्ती देवधर्म-पारंपरिक नीतिकल्पना यांचा अवलंब करताना कुठल्याही प्रकारची चिकित्सा वृत्ती दाखवत नाहीत हेही खरे आहे. ‘‘सत्याचा शोध करणाऱ्या व्यक्तीला देवकल्पनेच्या बाबतीत अज्ञेयवादी होण्याशिवाय गती नाही’’ हे वामनरावांनी दाखवले आहे तसेच केवळ अज्ञेयवादाने मनुष्य सुखी होई शकत नाही हेही स्पष्ट केले आहे. सामान्य माणसातला देव जागृत दोईल तेव्हाच; देवाचे काम माणसाच्या हातून होत राहील. वेगळ्या देवाची गरज उरणार नाही.’’ असा संदेश देणारी सुशीला आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आपण असतानाही आपल्याला पथप्रदर्शक वाटेल-अशीच तेजस्वी आहे. संबंध विश्व हेच आपले घर मानणाऱ्या विश्वमानवाची तिची संकल्पना आज तेवढीशी अवघडही उरलेली नाही. माहिती तंत्रज्ञानाने आपण सारे एकत्र आलो आहोत. नवा माणूस नवा समाज त्यातूनच घडणार आहे.

***सुशीलेचा देव, पृष्ठे १२०, ऐंशी रुपये***



**अन्यायाच्या जाणीवेने**
**संवेदनक्षम मनावर**
**खोलवर उमटलेले ओरखडे**

# जागल्या

**दया पवार**

स्तंभलेखनाच्या निमित्ताने दया पवार यांनी काही छोटेखानी लेख लिहिले. एरवी स्फुटलेखन करण्याचे कोड त्यांना नव्हते. त्यामुळे या अल्पकाळ चाललेल्या सदरातील लेखांमध्ये दीर्घकाळ मनात रेंगाळलेले आणि प्रसंगी सतावत राहिलेले विषय आपोआपच आले. डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल, इत्यादींचे विचार व व्यक्तिमत्त्व, महार समाजाचे इमान, सहा डिसेंबरची रात्र, भारतसुंदरी स्पर्धा, मुंबईतले खंडणीवसुलीचे वाढते प्रस्थ, दलित जीवनातले ताणतणाव हे विषयही यात येतात. नवीन नाटके पाहिली, पुस्तके वाचली तर त्यावरूनही मनात येणारे विचार प्रकट करावेसे वाटतात. काही ओळखीच्या माणसांची सुखदु:खे सांगावीशी वाटतात. कधी खेडवळ भाषेत, कधी नागरी प्रमाणभाषेत, कधी संवादरूपाने, कधी स्मरणसाखळीच्या रूपात. कधी स्पष्ट, कधी सूचक.

प्रख्यात दलित लेखक अण्णाभाऊ साठे यांच्यावरचा लेख खूपच महत्त्वाचा आहे. ‘‘अण्णाभाऊ साठे यांनी अवघी जिंदगी लाल बावटेवाल्या पार्टीसाठी झिजवली. हाडाची काडं केली. उरी फुटे पहातर गायले, नाचले, तुरुंगात गेले. अण्णाभाऊ आन् अमर शेख साऱ्या मराठी मुलखात जागरन करीत. हजारो मान्सं झुंडीनं त्याचं कलापथक पाहात. स्वातंत्र्यचळवळ असू, कामगार लढे असू न्हायी तर बेळगावचे कारबारडांग सहीत अख्या मराठी मुलखाची मागनी असू, ही जोडगोळी तुफानासारखी रनमैदान गाजवीत. पुढं पुढं लाल बावट्यावाले फाटले. दोन तुकडे झाले. एक सीपीआय तर दुसरा सीपीएम. या जोडगोळीची फाटाफूट झाली. निवडणूक आली की पार्टीवाले त्यांना भाव द्यायचे. पन निवडणूक मोरचा संपली की हे कलावंत अडगळीत. अण्णाभाऊंचे तर पुढं लयी हाल झाले. इडीकाडीलाही

मोताद झाले. लाल बावटेवाले जसे या कलावंताला इसरले तसे दलित लेखकही विसरले. पहिल्यांदा अण्णाभाऊनं दलित सबूद अजरामर केला. दलित सबूद जातीबाहेर काढला. सारे गोरगरीब – पिळले गेलेले – भूमीचे पुत्र असा नवा डोस दिला. ही धरती शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलिताच्या तळहातावर तरली होय' ही घोषणा त्यांनीच पहिल्यांदा केलीय. भल्याभल्यांचे डोळे दिपले... अण्णाभाऊंना अनेकांनी लुबाडले. पाचदहा रुपयांसाठी, एखाद्या दारूच्या बाटलीसाठी त्यांचे कथेचे, पुस्तकाचे, सिनेमाचे हक्क विकत घेतले. तो जवा गुजरला तवा त्याला जाळायला, कफन द्यायला जवळ पैसा अडका नव्हता. जावून बघतो तर बाजेवर त्यांचा काळा कुळकुळीत देह सापळा होऊन पडलेला. उशाशेजारी गॉर्कीचा पुतळा. घर सारे उजाड. शेजारीपाजारी बोलत होते. सारखे दारू पीत. खायला काही नाही. दाळंचं पानी पीत. जाळायला पैसा नव्हता. जातवाला मंत्री कुनाच्या तरी हाती पैसे देऊन गेला पण जमलेल्या लोकांत कुनीच कबूल व्हत नव्हतं. सबसांजेला अमर शेख आले. ते आपल्या दोस्तीला जागतात. शेवटच्या शवयात्रेला दहापंधरा मान्सं असत्यात. नारायण सुर्वे, अमर शेख, बाबुराव बागुल, वा. वि. भट, पारटीवाले कुनीच दिसत न्हायीत. 'जग बदल घालूनी घाव सांगून गेले भीमराव' असं गर्जून सांगणाऱ्या अण्णाभाऊंचा जगानं असा इपरीत बदला घेतला हे पाहून आजही मन तीळ तीळ तुटतं."

अण्णाभाऊ साठे यांच्या उपेक्षेची कहाणी सांगताना, कम्युनिस्ट पक्षाने त्यांची केलेली उपेक्षा ही दया पवारांना सर्वात जास्त खटकते असे दिसते.

अशा अनेक गोष्टी त्यांना खटकतात.

भिवंडीला जातीय दंगल झाली. ९६२ आरोपींपैकी ९६१ लोक कोर्टात निर्दोष सुटले. एकाला फक्त ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. पण तो जेमतेम पंधरा दिवसच जेलमध्ये राहिला. (पृष्ठ ५६)

मुंबईत ते मटनाच्या दुकानाशी जातात. एका सुशिक्षित महिलेच्या हाती मटनवाला शंभराच्या काही नोटा देतो. ती अनेक दुकानातून तशाच नोटा घेऊन पर्समध्ये टाकत असते. दया पवार त्या दुकानदाराला विचारतात, "भाई ये क्या ये? काइका चंदा दे रहे हो?" तो उत्तर देतो, "भाई यह जिझिया कर है." अलीकडे पुरुष मागं राहून बायका रस्त्यावर उतरतात, रस्त्याची नाकेबंदी करतात – हे दया पवारांना खटकते! कबुतरे शांतीपाठ करतात. म्हणून त्यांच्यावर चिलखत कर लादला जातो. काही कबुतरे चॉपर–गुप्ती–दगडधोंडे पाहून उडून जातात. पण शेवटी करवसुलीची व्यूहरचना बदलली गेली. त्यादिवशी साऱ्या कबुतरांच्या माना मुरगळल्या गेल्या? का. दया पवार लिहितात : "कबुतरे फसली. सेना आली भगव्या वेषात." (६९)

पाचशे रुपये डझन हापूसचा भाव ऐकल्यावर दया पवार बालभारतीच्या पुस्तकातले हापूस आंब्याचे चित्र पाहून एक बाप लेकात झालेला संवाद देतात.



*"बाबा, ह्याला काय म्हनत्यात?"*
*"लेका, ह्याला हापूस म्हणत्यात."*
*"हापूस कसा लागतो?"*
*"कुनास ठाऊक. लहानपणी खाल्ला व्हता. आता चवच इसरलोय."*
*"मग आता कोन खातये हापूस?"*
*"लेका, आता हापूस आरब खात्यात."*
*"मग मला हापूस खानारा आरब तरी दाखवा." (७३)*

भारतसुंदरी स्पर्धेच्या निमित्ताने आपल्या लेकीबाळी उघड्या नागड्या नाचत असताना हरे कृष्ण हरे राम गाणं लावून आपल्या देवादिकांची टवाळी केली जाते याचे भान कुणालाच कसे नाही? बजरंग दल, विहिंप, भाजप, संघवाले ह्यांचा निषेध कसा बरं कानावर आला नाही? आपले पत्रकार! ह्यांनी तर कहरच केला. मिटक्या मारीत रकानेच रकाने पानभर लिव्हले. लेकबाळीचे फोटू झळकले. लावणीकारानं लिव्हलंय. अटकर बांधा, चाफेकळी नाक, टपोरे डोळे, गव्हाळी रंग, म्हणजे सुंदरता. फॉरीनवाल्यांच्या सुंदरतेच्या कसोट्या वेगळ्या. उंच सडसडीत, लंबू टांग, गाल खपाटीला गेलेले, डोळे मिचमिचीत, देहाची मापे ठराविक. चटपटीत बोलणं. पोहताना, नाचताना, चालताना कशा दिसणार ह्यावर मार्क ठेवलेले. मला तर टीव्हीवर हे सारं बघताना जत्रेतल्या जनावरांच्या बाजाराची आठवण येत होती. आखूड शिंगी, दुधाळ, किती दाताची, कास किती मोठी, हायब्रीड आहे की नाही?" (७७–७८) आणि या भारत सुंदरीवरच्या लेखाचा शेवट करताना ब्लॅक इज ब्युटीफुल म्हणणाऱ्या दलित लेखकाचा किस्सा दिला आहे.

आपल्या देशात सर्वांनाच गोरीपान बायको हवी असते. एका दलित लेखकाने निग्रो बाईचा काळ्या कातळासारखा पुतळा घरी नेऊ बायकोला म्हटले, "हा बघ पुतळा. तुझ्यासारखा." तर तिनं वरवंटा घेऊन पुतळ्याचा चकनाचूर केला! (७८)

एका मराठी वकिलाच्या दिवाणखान्यात आंबेडकर–फुले यांची बुके दिसतात. तुकोबांची वचने भिंतीवर असतात. मराठा महासंघाची पाटी असते. दोन तीन तलवारीही भिंतीवर लावलेल्या. तात्याची हाडकी हाडवळ्याची केस त्याच्याकडे देण्यासाठी पवार त्याला घेऊन वकीलाकडे जातात. तात्या करंगळी वर करून टॉयलेट कुठे विचारतात. वकील सांगतात, "खाली उतरलात की समोरच सुलभ शौचालय आहे. तिथं जा." तेव्हा त्या भिंतीवरची तुकारामाची वचने आणि फुले आंबेडकरांची पुस्तके – हा सगळा देखावाच हे लक्षात येऊन भयंकर अपमान झाल्यासारखे वाटते.(८१)

दया पवार अशा वेगवेगळ्या मार्गांनी आपली घुसमट व्यक्त करतात. कधी सरळ. कधी सूचकतेने. कधी फँटसीचा आधार घेतात. मग जांभूळाचे आख्यान पाहताना त्यांना स्वप्नात वेगळेच नाटक दिसते. सहावा पांडव आल्याने धुरपदाच्या वाटणीचे आमचे दिवस

कमी होणार अशी सहदेव-नकुल तक्रार करतात. तेव्हा धर्मराज त्यांची समजूत काढतो, ''डोक्यात राख घालू नका. मी आता म्हातारा झालोय. माझे दिवस तुम्ही घ्या.''

मराठी कामगार साहित्य संमेलनात रशियाचा गोर्बाचेव्ह दया पवारांना दिसतो. आणि पालखीत दास कॅपिटल कसं नाही असा सवाल करतो. (५) तर पवारांना प्रश्न पडतो, गाथा-ज्ञानेश्वरीबरोबर अण्णाभाऊ साठे-बाबुराव बागुल यांचं पुस्तक का नसावं?''

दया पवारांमधील 'जागल्या'च्या नजरेला अशा विसंगती आणि ढोंगीपणाच्या गोष्टी नेमक्या टिपता येतात. दलितांवरील प्रत्येक अन्यायाची त्यांच्या अत्यंत संवेदनशील मनावर वेदनादायक चिरही उमटते. म्हणून हे अगदी छोटे स्फुट लेखांचे पुस्तकही खलिल जिब्रानच्या टियर्स अँड लॉफ्टरप्रमाणे अस्वस्थ करणारे वाटतात.

***जागल्या, पृष्ठे ८१, पन्नास रुपये***


**मेहता मराठी ग्रंथजगत**

दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल) रुल्स १९५६

नियम क्र. ८ अन्वये निवेदन **फॉर्म ४**

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | : | मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०. |
| २) प्रकाशन काल | : | मासिक |
| ३) मुद्रक प्रकाशक व संपादक | : | सुनील मेहता, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०. |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ४) प्रकाशनाची मालकी | : | सुनील मेहता, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०. |

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १५-३-१९९९

सुनील मेहता
प्रकाशक




# फुले आणि काटे

## नव्या सूक्ष्म अनुभूती जितक्या जास्त तितका कवी सर्वस्पर्शी

''सहवास' या पुस्तकातील कविता मी पुन्हा वाचते तेव्हा त्यात अनुभूतीच्या अभिव्यक्तीचा कोवळेपणा मला जाणवून येतो. अलीकडील अनुभूतींची सूक्ष्मता दिसून येत नाही. जे वाटतं तेवढंच मांडणं हीच गोष्ट त्यात मी साधली आहे. अनुभूती ज्या विविध प्रतिमांतून व्यक्त करायची, त्या प्रतिमांची मर्यादा मला त्यात दिसून येते. माझ्या अलिकडील कवितेपेक्षा ती कविता स्त्रीगीताला अधिक जवळची आहे असं मला म्हणायचं आहे. माझ्या अलिकडील कवितांतून सूक्ष्म अनुभूतींचा माझा मलाच प्रत्यय येतो. अक्षरांच्या वळणावर लिहिलेली अडथळे ही कविता मी जेव्हा वाचते, तेव्हा मला हे आढळून येतं. प्रतिमांच्या बाबतीतदेखील मला अधिक समजूत आली नसती तर 'पत्राचे कपटे', 'खुणा', 'नाल', 'दिनदर्शक' इत्यादी कविता मला लिहिता आल्या नसत्या. पण मी प्रतिमा मुद्दाम वापरत नाही. कविता लिहायला लागल्यापासून आजपर्यंतच्या कविता चाळल्या तर माझ्या अभिव्यक्तीच्या मर्यादा मला पूरेपूर दिसून येतात. दीडशे कवितांपैकी बहुतेक सर्वांत प्रीतीच्या छटा आणि निसर्ग यांनाच अभिव्यक्ती मिळालेली आहे. पुष्कळदा निसर्गसुद्धा निसर्गासाठी आला नसून प्रीतीच्या छटेच्या अभिव्यक्तीसाठी आलेला आहे. मी काही या दोनच अनुभूतींवर जगत नाही. इतर पुष्कळ अनुभवांतून मी जात असते. पण मला वाटतं, यामुळे त्या परिमित अभिव्यक्तीला कमीपणा येण्याचे काहीच कारण नाही. अनुभूतींना अभिव्यक्त करणारे विशिष्ट एरियल्स कवीच्या मनात उभे असावेत, हे जितके अधिक तितकी त्या कवीची प्रतिभा अधिक श्रेष्ठ, अधिक श्रीमंत. पण हे कवीच्या हातात नसतं. त्याच्या मनोधर्मानं ते एरियल्स अगोदरच उभे करून ठेवलेले असतात. कवितेचं मूल्य कवितेच्या विषयांत, आशयात नसून तो विषय व तो आशय व्यक्त करण्याच्या कवीच्या सामर्थ्यावर असतं. जी अनुभूती आपल्याला व्यक्त करता येत नाही ती न केलेली बरी, असं माझं प्रामाणिक मत आहे. जी अनुभूती आपण साकार करू शकतो त्या अनुभूतीच्या कक्षांचा विस्तार करणं हे कवीच्या हातात असतं. नव्या सूक्ष्म अनुभूती, नव्या प्रतिमा जितक्या अधिक तितकं त्या कवीचं सर्वस्पर्शित्व अधिक. हे सर्वस्पर्शित्व वाढवणं हे कवीचं कर्तव्य आहे.''

*इंदिरा संत (माझ्या कवितेची वाटचाल, मे १९५२, फुलवेल, पॉप्युलर प्रकाशन, पृष्ठ १९१-१९२)*

## मी नवीन काही मिळवले असेल तर ते इतकेच!

१९५२च्या आपल्यावरील विचारात फारसा फरक पडलेला नाही असे सांगून इंदिरा संत यांनी वंशकुसुम या नव्या संग्रहाच्या प्रस्तावनेत १९९४साली त्या भूमिकेला अद्ययावत रूप दिले आहे. त्यात त्या म्हणतात : ''कवीच्या किंवा कलानिर्मितीक्षम व्यक्तीच्या मनात एरियल्स उभे केलेले असतात. ते एरियल्स मनात खोलवर जाऊन पोचणाऱ्या अशा अनुभवातील क्षणांचे अणू पकडून ठेवतात. कवीचे मन निर्मितिक्षम असते आणि त्या मनाचे अंतराळही वेगळे असते. त्यात पंचेंद्रियांना भ्रम देऊन आल्हाद देणे हे एक देवाघरचे देणे असते. वास्तव अंतराळात आपण बरेचदा भ्रम पाहतो. मृगजळ दिसते. हरिणाबरोबर आपल्यालाही भुलवते. प्रात:काळी वा संध्यासमयी कडक उन्हात आकाशात गंधर्वनगरी उभी राहिल्याचा भास आपल्याला होतो. आपण इंद्रधनुष्य पाहतो. हे फक्त दृष्टीचे भ्रम असतात. असेच इतर ज्ञानेंद्रियांचे सुद्धा भ्रम असतात. ते भ्रमरूप शब्दरूपात आणणे हे प्रतिभेचे सामर्थ्य असते. शब्दांची योजना वाणी ही शक्ती करते. म्हणून कवितेतील शब्दाला अतिशय महत्त्व असते. त्या त्या 'भावने'ला आणि 'भ्रमा'ला उचित असा उत्कट शब्द, आशयघन शब्द मिळाला तर त्याचे सार्थक होते. यालाच आपण शब्द आत्मस्पर्शी असावा असे म्हणतो. ज्ञानेंद्रियांचे संवेदन – त्या संवदनेला झालेले भ्रम यांना सामावून घेणारी निर्मितीची शक्ती, त्या शक्तीने निर्माण केलेले, भावनेच्या काव्यात्म रूपाला जिवंत करतील असे शब्द ही कवितेची मुख्य मागणी असते. असा एक विचार मनात आजवर घुमतो आहे. आज मला माझ्या कवितेत निसर्गाचे रूपही मिसळलेले दिसते. कवितेसाठी किंवा कवितेतून निसर्ग प्रकट होत असतो. आज निसर्गातूनच ती प्रकट होत आहे असे मला वाटते. निसर्गाशी एकरूप होणे, आपल्या सुखदु:खासकट त्याच्यात मिळून जाणे तिला थोडेफार साधले आहे असे वाटते. इतक्या संग्रहांनंतर मी नवीन काही मिळविले असेल तर ते इतकेच. हे फक्त अनुभवांचे प्रकटीकरण. शोध, अभ्यास, शास्त्रप्रयोग याबाबत मी पूर्वीइतकीच अजून अजाण आहे. माझ्या मतीप्रमाणे जर काही मनात उजळले असेल तर एवढेच! कवितेची शब्दशक्ती. अर्थात भावकवितेची. तीत शब्द आत्मस्पर्शी हवा.

*–इंदिरा संत (वंशकुसुमच्या निमित्ताने, १९९४. फुलवेल, पृष्ठ २३६–३७)*


**यमदूताला दारातच थोपवा!**

**डॉ. डीन ऑर्निश यांच्या**
**'PROGRAM FOR REVERSING HEART DISEASE' चा**
**भारतीय आविष्कार**
**डॉ. जगदीश हिरेमठ उपक्रम**

**हृदयविकार निवारण**

**शुभदा गोगटे**

पृष्ठे : **२७२** / किंमत : **दीडशे रुपये**




## मेहता मराठी ग्रंथजगत वर्गणीचे नूतनीकरण करा!

*वाचकमित्रहो,*

मराठी ग्रंथविश्वाची अद्ययावत माहिती देणाऱ्या मराठी ग्रंथजगतचे आपण वर्गणीदार आहात याचा आम्हाला अभिमान वाटतो.

**जानेवारी ९९पासून** आपला वार्षिक नूतनीकरण करण्याचा व्याप वाचावा म्हणून आम्ही सवलतीची योजना जाहीर करीत आहोत.

**एक वर्षाची वर्गणी ८०रुपये    तीन वर्षांची वर्गणी २००रुपये बचत ४०रुपये**
**पाच वर्षांची वर्गणी ३००रुपये    बचत १००रुपये**

पाच वर्षांची वर्गणी एकदम पाठवल्यास आपणांस सर्वांत जास्त लाभ होईल. पुढे वर्गणी वाढली तरी आपल्याला याच वर्गणीत अंक नियमित मिळत राहतील.

*वर्गणी पाठवण्याचा पत्ता :*

**मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

स.न.वि.वि.

मला ग्रंथजगतचे १/३/५ वर्षांसाठी वर्गणीदार व्हायचे आहे. सोबत ८०/२००/३००रु.चा ड्राफ्ट/मनीऑर्डर पाठवत आहे.

माझे नाव ______________________

पत्ता ______________________

______________________

गाव/शहर ______________ पिनकोड नंबर ______________

माझ्या पुढील मित्रांनाही हे मासिक १/३/५वर्षे भेट म्हणून माझ्यातर्फे पाठवावे. त्यांचीही वर्गणीही सोबत जोडत आहे.

१) नाव ______________________
पत्ता ______________________
______________________
गाव/शहर ______________ पिनकोड नं. ______________

२) नाव ______________________
पत्ता ______________________
______________________
गाव/शहर ______________ पिनकोड नं. ______________

*डावीकडून डॉ. मीना प्रभु, अनिल मेहता, प्रतापराव पवार, डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. आनंद यादव*

'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे डॉ. मीना प्रभु यांच्या 'दक्षिणरंग' या पुस्तकाचे प्रकाशन दि. २६ फेब्रुवारी रोजी श्री. प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव व डॉ. कुमार सप्तर्षी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रकाशक अनिल मेहता यांनी स्वागत केले.

---

*डावीकडून शुभदा गोगटे, डॉ. आशा प्रतिनिधी, डॉ. जगदीश हिरेमठ, सुनील मेहता, अनिल मेहता*

शनिवार दि. २७ फेब्रुवारी रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे 'हृदयविकार निवारण' या शुभदा गोगटे यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. डी. एस. उर्सेकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. सौ. आशा प्रतिनिधी या होत्या. या प्रसंगी पुण्यातील प्रसिद्ध हृदयविकारतज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनीही आपले विचार मांडले.


मार्च १९९९
वर्ष तिसरे
अंक तिसरा


# मेहता मराठी ग्रंथजगत

## *अनुक्रमणिका*


**संपादकीय** .......... २

**साहित्य वार्ता** .......... ६

**पुरस्कार** .......... ११

**पुस्तक परिचय** ..........

- एकला चलो रे — दया पवार .......... १४
- खिडकीलाही डोळे असतात — डॉ. बाळ फोंडके .......... १९
- आत्मवेध — निरंजन घाटे .......... २३
- रंगरेषा — शांता शेळके .......... २९
- निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय — गंगाधर महांबरे .......... ३२
- नको स्वातंत्र्य स्त्रीला? — दिलीप परदेशी .......... ३६
- सुशीलेचा देव — वि. स. खांडेकर .......... ४०
- जागल्या — दया पवार .......... ४३

**शब्दकोडे, नवीन स्पर्धा** .......... ३५

**स्पर्धा निकाल** .......... ३९

**फुले आणि काटे** .......... ४७



संपादक सुनील मेहता | कार्यकारी संपादक शंकर सारडा | संपादन सहाय्य सुनीता दांडेकर | मांडणी मेहता पब्लिशिंग हाऊस

अंकाची किंमत १० रु. वार्षिक वर्गणी ८० रु. | वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी. | दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

*संपादक-मुद्रक-प्रकाशक :* **सुनील मेहता**, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे - ३०.

*अक्षरजुळणी :* **मेहता पब्लिशिंग हाऊस**, १२१६, सदाशिव, पुणे - ३०. फॅक्स : ०२०-४७५४६२


*या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*